POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-२६२ ● मुंबई, शनिवार, २५ एप्रिल २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

# राज्यात सध्या भोंदू बाबांचा सुळसुळाट

## सावधान... ठाणे जिल्ह्यात फिरतोय भोंदू बाबा!!!



### काळी जादूटोणा उतरण्यासाठी लावला 2.50 करोडचा गंडा

दिवसेंदिवस आता फसवणूकची गुन्हे वाढत चालले आहेत. मागील काही दिवसांपासून अनेक गुन्हे समोर आले आहेत. नाशिक येथील भोंदू बाबा अशोक खरात प्रकरण ताजा असताना आता ठाण्यात देखील भोंदू बाबा मंजुनाथ बाबा उर्फ दीक्षित बाबाने ठाण्यातील एका कुटुंबाला तिच्या घरावर काळी जादूटोणा केल्याचे सांगून त्यावर उपाय करण्यासाठी आणि आर्थिक सुबत्ता येण्यासाठी अघोरी विधी करावी लागेल असे सांगून वेळीवेळी विधी करायची आहे, म्हणून २.५० कोटी रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. ठाण्यातील कासरवडवली पोलीस ठाण्यामध्ये हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उच्चभ्रू सोसायटीमध्ये राहणारी महिलीने तक्रार दिली की मंजुनाथ शेट्टी नावाचे भोंदू बाबाने आमच्या घरावर काळी जादूटोणा आमच्याच ऑफिसमध्ये काम करणाऱ्या व्यक्तीने केला असे असे सांगून आमच्याशी २.५० कोटी रुपयांची फसवणूक केली आहे अशी तक्रार त्यांना दाखल केली होती. तपासामध्ये यातील अटक आरोपी मंजूनाथ सुंदर शेट्टी उर्फ दिक्षीत बाबा हा महिलांशी ओळख वाढवुन त्यांचा विश्वास संपादन करून त्यांच्याकडे पैशांची मागणी करुन त्यांची फसवणुक करीत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. त्याचबरोबर त्याच्याविरुद्ध यापूर्वी देखील माणिकपुर पोलीस ठाणे, वसई येथे महिलेच्या बलात्काराचा आणि पैशांचा अपहाराचा तसेच वर्तकनगर पोलीस ठाणे येथे महिलेच्या विनयभंग आणि पैशांची फसवणूक, अपहरनाचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपी याने ठाणे, मुंबई परिसरातील अनेक महिलांना अशाच प्रकारच्या भूलथापा देऊन त्यांची देखील फसवणूक केल्याची शक्यता आहे. त्यादृष्टीने पुढील तपास सुरु आहे. ठाण्यामधील या बाबाने फक्त ठाण्यातच नाही तर मुंबई त्याचबरोबर राज्याबाहेर देखील लोकांना फसवले आहे. दिवसेंदिवस हे प्रकार वाढत चालले आहेत. काळ्या जादूची भिती दाखवून लोकांची लूट हा बाबा करत असे. त्याचबरोबर अघोरी पुजा करुन तुम्हाला जास्तीत जास्त पैसा मिळवून देणार याचे अमिष दाखवून लोकांना फसवत होता. या बाबाने ठाणे आणि मुंबईमध्ये अनेकांना कोट्यावंधीचा गंडा लावला आहे.

## चिमुरड्यांना दाताने पकडलं, हवेत फिरवलं अन् मग खिळ्यांवर... अकोल्यातील भोंदू बाबाचे अंगावर शहारे आणणारे कृत्य

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

महाराष्ट्र राज्याला पुरोगामी विचारांचा वारसा लाभला आहे. असे असताना आजही काही भागात अंधश्रद्धेचे अघोरी प्रकार सुरूच असल्याचे धक्कादायक वास्तव समोर येताना दिसत आहे. अकोला जिल्ह्यातील मूर्तिजापूर तालुक्यातील निंबा गावात एका भोंदू बाबाने उपचाराच्या नावाखाली चिमुकल्यांच्या जीवाशी खेळ मांडल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी सर्वत्र संताप व्यक्त होत होता. आता अखेर भोंदू चेतन महाराज मुळे याच्यावर विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यामुळे लवकरच त्यांना अटक होण्याची शक्यता आहे..



**नेमकं प्रकरण काय?**

निंबा गावातील चेतन सुनील मुळे हा स्वतःला गुलाल शेष बाबा म्हणवून दरबार भरवत असे. या दरबारात व्याधी आणि कौटुंबिक समस्या दूर करण्याचा दावा केला जायचा. मात्र, नुकताच या बाबाचा अंगावर शहारे आणणारा एक व्हिडीओ व्हायरल झाला आहे. यामध्ये हा भोंदू बाबा उपचाराच्या नावाखाली लहान मुलांना चक्क दाताने उचलून हवेत गरागरा फिरवताना दिसत आहे. इतकेच नाही तर मुलांना खिळ्यांच्या आसनावर बसवणे यांसारख्या इतर अघोरी प्रथांचा अवलंब करत तो त्यांच्या आरोग्याशी खेळत होता. या प्रकरणाची दखल घेत महिला व बालकल्याण समितीच्या सदस्य प्रांजली जैस्वाल यांनी मूर्तिजापूर ग्रामीण पोलिसात तक्रार दिली. या तक्रारीनंतर पोलिसांनी चेतन मुळे याच्यावर भारतीय न्यायसंहीता कलम १२५, बालन्याय अधिनियम २०१५ चे कलम ७५ आणि महाराष्ट्र जादूटोणाविरोधी कायदा २०१३ च्या कलम ३ नुसार गुन्हे दाखल केले आहेत.

## सरळगाव येथे प्राचार्य श्री. गोरख ओंकार माळी यांचा सेवापूर्ती सत्कार सोहळा उत्साहात संपन्न !!!







■ **सरळगाव। प्रतिनिधी,**

पद्मश्री अण्णासाहेब जाधव भारतीय समाज उन्नती मंडळ, भिवंडी संचलित सरळगाव विभाग हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय येथे शाळेचे प्राचार्य श्री. गोरख ओंकार माळी यांच्या सेवापूर्तीनिमित्त भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन दिनांक २४ एप्रिल 2026 रोजी करण्यात आले. हा कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष सन्माननीय बी. डी. काळे सर ,आमदार मा. गोटीराम पवार साहेब, आमदार मा.निरंजन डावखरे साहेब उपस्थित होते. यावेळी संस्थेचे खजिनदार श्री. भोईर सर, उपाध्यक्ष श्रीराम भोईर साहेब, मा.के.बी घाटोळे सर, मा. सोण्या पाटी साहेब तसेच श्री. एन.एम भामरे मा.बी.एन पाटील सर मा.प्रशांत भामरे सर मा. दिपक पवार साहेब. मुख्याध्यापक संघाच्या अध्यक्ष मा.मनिषा देसले मॅडम, शाळा समितीचे सदस्य मा. विष्णु पवार मा.राजेश झुंजारराव इ.यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमास संस्थेच्या विविध शाखांचे मुख्याध्यापक, शिक्षक, पालक, विद्यार्थी, सरळगाव शाळेचे सर्व कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. सत्कारमूर्ती श्री. गोरख माळी सर यांनी आपल्या दीर्घ सेवाकाळात प्रामाणिकपणा, शिस्त आणि विद्यार्थ्यांप्रती असलेले प्रेम यामुळे शाळेची शैक्षणिक प्रगती साधली. त्यांच्या कार्याचा गौरव करताना मान्यवरांनी त्यांच्या योगदानाचे कौतुक केले व पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमात विविध मान्यवरांनी मनोगत व्यक्त करताना माळी सरांच्या कार्यशैलीचा आदर्श घ्यावा, असे आवाहन केले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांनी सोहळ्याची रंगत वाढवली. शेवटी सत्कार, स्मृतिचिन्ह व शाल-श्रीफळ देऊन माळी सरांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन शाळेच्या सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने पार पडले. संपूर्ण कार्यक्रम भावनिक आणि प्रेरणादायी ठरला.

**सौजन्य-श्री विश्वनाथ राऊत सर**

## तुमच्या मुलीला भूतबाधा झालीय, दर गुरुवारी उपचारासाठी... नाशिकमधील भोंदू बाबाचे संतापजनक काळे कृत्य



■ **नाशिक। प्रतिनिधी,**

नाशिक जिल्ह्यात अध्यात्मिक उपचारांच्या नावाखाली एका 28 वर्षीय महिलेचे लैंगिक शोषण करत तिला धमकावल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. पीडित महिलेला मानसिक त्रास आणि कौटुंबिक समस्यांनी ग्रासले होते. या परिस्थितीचा फायदा घेत निफाड तालुक्यातील धरणगाव खडक येथील महेशगिरी उर्फ महेश दिलीप काकडे या ढोंगी बाबाने तिला आपल्या जाळ्यात ओढले. पीडितेच्या पालकांनी तिला उपचारासाठी या बाबाकडे नेले असता, त्याने तिला 'भूतबाधा' असल्याचे सांगून भीती घातली. सुरुवातीला दर गुरुवारी पूजेसाठी बोलावून त्याने पीडितेशी जवळीक साधली आणि त्यानंतर तिच्या मोबाईलवर अश्लील मेसेज पाठवून मानसिक छळ सुरू केला, ज्यामुळे एका सुसंस्कृत समाजातील अंधश्रद्धेचा भयानक चेहरा पुन्हा एकदा उघड झाला आहे.

पीडितेने दिलेल्या तक्रारीनुसार, 23 ऑगस्ट 2024 रोजी या ढोंगी बाबाने तिची दिशाभूल करून पंचवटी परिसरात बोलावले. तिथून त्याने तिला आपल्या गाडीत बसवून त्र्यंबकेश्वर रोडवरील एका लॉजवर नेले. महिलेने तिथे जाण्यास विरोध केला असता, आरोपीने आपल्या गळ्यातील रुद्राक्ष दाखवत "माझ्याकडे दैवी शक्ती आहे, तू मला रोखू शकणार नाहीस," अशी धमकी देऊन तिच्यावर जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवले. इतक्यावरच न थांबता या नराधमाने पीडितेचे नग्न फोटोही काढले. या घटनेनंतर जेव्हा पीडितेने पोलिसांत जाण्याचा विचार केला, तेव्हा आरोपीने तिला आपल्या कार्यालयात बोलावून "मी गुंडा आहे, जर कोणाला सांगितले तर परिणामांना तयार राहा," असे म्हणत धमकावले. पुरावे नष्ट करण्यासाठी त्याने पीडितेचा मोबाईल हिसकावून त्यातील सर्व मेसेज आणि फोटो डिलीट करून टाकले होते.

समाजात स्वतःला दैवी शक्तीचे अवतार म्हणवून घेणाऱ्या अशा समाजकंटकांना वेळीच चाप लावणे आवश्यक आहे. पालकांनीही आपल्या मुलांच्या समस्या सोडवण्यासाठी डॉक्टरांकडे जाण्याऐवजी अशा भोंदू बाबांकडे जाणे टाळले पाहिजे. अंधश्रद्धा निर्मूलन समितीने केलेल्या मदतीमुळे या पीडितेला न्याय मिळण्याची आशा निर्माण झाली असून, पोलिसांनी नागरिकांना कोणत्याही अन्यायाविरुद्ध किंवा अशा ढोंगी बाबांविरुद्ध तात्काळ तक्रार करण्याचे आवाहन केले आहे.

### अंनिसच्या मदतीने भोंदू बाबाचा पदार्फाश आणि कायदेशीर कारवाई

भीतीच्या छायेत काही काळ शांत राहिल्यानंतर पीडित महिलेने अखेर हिंमत दाखवून अंधश्रद्धा निर्मूलन समितीशी (अंनिस) संपर्क साधला. अंनिसच्या कार्यकर्त्यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत पीडितेच्या पाठीशी उभे राहण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर लासलगाव पोलीस ठाण्यात या भोंदू बाबाविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेने नाशिक जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली असून, अशा फसव्या बाबांच्या दाव्यांना बळी पडू नका, असे आवाहन अंनिसचे कृष्णा चांदगुडे यांनी केले आहे. कठीण काळात कोणत्याही अवैज्ञानिक किंवा धार्मिक विधींचा आधार घेण्यापेक्षा कायदेशीर आणि वैद्यकीय मार्गांचा अवलंब करणे किती गरजेचे आहे, हे या घटनेवरून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

## बेकायदा बेड्या ठोकल्याबद्दल प्रत्येकी ५० हजारांची भरपाई... उच्च न्यायालयाचे राज्य सरकारला आदेश

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

पोलिसांनी बेड्या ठोकल्यामुळे एका वकील आणि माजी सैनिकाचा झालेला अपमान गंभीर दखलपात्र असल्याचे मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. या दोन्ही याचिकाकर्त्यांना प्रत्येकी ५० हजार रुपयांची भरपाई देण्याचे आदेश न्यायालयाने राज्य सरकारला दिले आहेत. पोलिसांकडून होणारा अपमान हा केवळ व्यक्तीचा नसून, तो फौजदारी न्यायव्यवस्थेवरील विश्वास कमी करणारा असल्याचे ताशेरे न्यायालयाने ओढले आहेत.

### कर्तव्याचे भान ठेवावे

या प्रकरणी अमरावती पोलीस अधीक्षकांनी दोषी पोलिसांवर चौकशीअंती कारवाई केल्याची माहिती न्यायालयात दिली. मात्र, केवळ कारवाईची घोषणा पुरेशी नसून मूलभूत अधिकारांचे उल्लंघन झाल्यामुळे नुकसानभरपाई देणे आवश्यक असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. जे लोक कायद्याची अंमलबजावणी करतात, त्यांनी केवळ आरोपी किंवा पीडितांप्रतिच नव्हे, तर राज्य आणि समाजाप्रति असलेल्या कर्तव्याचे भान ठेवले पाहिजे, असेही न्यायालयाने सुनावले.



उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठातील न्या. उर्मिला जोशी-फाळके आणि न्या. निवेदिता मेहता यांच्या खंडपीठाने हा निकाल दिला. 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' हे महाराष्ट्र पोलिसांचे ब्रीदवाक्य असून त्याचे पालन करणे आवश्यक आहे, असे खंडपीठाने नमूद केले. वकील योगेश्वर कावडे आणि माजी सैनिक अविनाश दाते या दोघांनाही अमरावती येथील पोलीस ठाण्यातून तहसीलदार कार्यालयात एसटी बसमधून बेड्या घालून नेले होते. या कृत्यामुळे त्यांच्या प्रतिष्ठेला बाधा पोहचल्याचे न्यायालयाने मान्य केले.

हे प्रकरण ऑगस्ट २०१० मधील असून, दाते यांच्या कारचे नुकसान झाल्याची तक्रार करण्यासाठी हे दोघे अमरावती जिल्ह्यातील तळेगाव पोलीस ठाण्यात गेले होते. मात्र, संबंधित व्यक्तीने दिलेल्या परस्पर तक्रारीवरून पोलिसांनी या दोघांनाही मध्यरात्री बेकायदेशीरपणे ताब्यात घेतले. त्यांना पोलीस कोठडीत कपडे काढून बसवण्यात आल्याचा आणि दुसऱ्या दिवशी बेड्या ठोकून सार्वजनिक वाहनाने तहसीलदार कार्यालयात नेल्याचा दावा याचिकाकर्त्यांनी केला होता. तहसीलदारांनी या प्रकाराबद्दल पोलिसांना बेड्या काढण्याचे निर्देश देत दोघांनाही जामीन मंजूर केला होता. या दोन्ही याचिकाकर्त्यांना आठ आठवड्यांच्या आत भरपाई देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## बाळूमामाचा अवतार असल्याचा दावा करणाऱ्या 'मनोहर मामा'ला अटक

■ **पुणे। प्रतिनिधी,**

स्वतःला बाळूमामाचा अवतार असल्याचा दावा करणारा स्वयंघोषित अध्यात्मिक गुरु मनोहर भोसले उर्फ ''मनोहर मामा'' याला सोलापूर ग्रामीण पोलीस यांनी पुण्यातील मांजरी परिसरातून ताब्यात घेतले आहे. फसवणूक, आर्थिक गैरव्यवहार तसेच महिलांच्या लैंगिक शोषणाच्या गंभीर आरोपांमुळे ही कारवाई करण्यात आली आहे.



**नेमके आरोप काय?**

या प्रकरणी कुडूर्वाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून, त्यानंतर सोलापूर ग्रामीण पोलिसांनी छापेमारी करत मनोहर मामाला अटक केली. पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

मनोहर मामा याच्यावर भक्तांकडून पैसे उकळणे, चमत्कारांच्या नावाखाली फसवणूक करणे आणि महिलांचे शोषण केल्याचे आरोप आहेत. ''खिशातील नोटांचे अचूक नंबर सांगणारा बाबाह्व म्हणून त्याची ओळख तयार झाली होती, ज्यामुळे मोठ्या प्रमाणात लोक त्याच्या दरबारात जात होते.

धक्कादायक बाब म्हणजे विविध राजकीय पक्षांतील काही नेते, सनदी अधिकारी देखील त्याच्या दरबारात हजेरी लावत असल्याची माहिती समोर आली आहे. काही प्रकरणांमध्ये मोठ्या पदांसाठी किंवा राजकीय फायद्यासाठी त्याचा सल्ला घेतला जात असल्याचेही सांगितले जात आहे.

समृद्धी महामार्गाच्या बांधकामामध्ये करोडोची माया कमावलेला एक सेवानिवृत्त सनदी अधिकारी नांदेड लोकसभा निवडणुकीत खासदारकीचे तिकीट मिळावं म्हणून हेलिकॉप्टरने या बाबाच्या दरबारात हजेरी लावली होती.

या कारवाईनंतर अशा स्वयंघोषित बाबांवर नियंत्रण ठेवण्याची गरज पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. आता या प्रकरणात आणखी कोणते धागेदोरे समोर येतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## भाईंदरमध्ये नोकरीच्या आमिषाने सुशिक्षित तरुणांची फसवणूक

■ **भाईंदर। प्रतिनिधी,**

नोकरी देण्याचे आमिष दाखवून तरुणांचा विश्वास संपादन करायचा आणि त्यांच्या कागदपत्रांचा आधार घेऊन बोगस कंपन्या स्थापन करायच्या, असा एक धक्कादायक प्रकार मिरारोडमध्ये उघडकीस आला आहे. याप्रकरणी नयानगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून गुन्हे शाखेचे खंडणी विरोधी पथक या प्रकरणाचा सखोल तपास करत आहे.

दिलेल्या तक्रारीनुसार, मिरारोड पूर्व शांती पार्क येथे राहणारे अझिम शाह (वय २७ वर्ष) यांना जुनेद आणि त्याच्या साथीदारांनी जून २०२५ पासून नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवले होते. जुनेदसह त्याचे मित्र अहमद, मोहिब, सलीम आणि हाजी यांनी अझिम यांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर केवायसीसाठी लागणारी महत्त्वाची कागदपत्रे त्यांच्याकडून घेतली. आरोपींनी अझिम यांच्या कागदपत्रांचा वापर करून त्यांच्या नावावर बेनामी कंपन्यांचे उद्यम आधार कार्ड तयार केले. त्यानंतर इतकेच नव्हे तर, या बोगस कंपन्यांच्या नावाने विविध बँकांमध्ये चालू खाती उघडण्यात आली. व्यवहार सुलभ व्हावे यासाठी आरोपींनी अझिम यांच्याकडून मोठ्या प्रमाणावर कोरे चेकबुक आणि आरटीजीएस



फॉर्मवर आधीच स्वाक्षऱ्या घेऊन ठेवल्या होत्या.

तक्रारीत नमूद केल्यानुसार, या कंपन्यांच्या माध्यमातून कोणताही प्रत्यक्ष व्यवसाय न करता केवळ कागदोपत्री खोटे विवरण तयार करण्यात आले. या बँक खात्यांवरून कोट्यवधी रुपयांची आर्थिक उलाढाल करण्यात आली असून, कोणताही व्यवसाय कर किंवा जीएसटी न भरता शासनाची मोठी फसवणूक करण्यात आली आहे. अझिम यांच्याप्रमाणेच इतरही अनेक तरुणांना अशाच प्रकारे जाळ्यात ओढण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच अझिम शाह यांनी नयानगर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन गुन्हे शाखेच्या खंडणी विरोधी पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश फडतरे या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. या रॅकेटमध्ये आणखी किती जणांचा समावेश आहे आणि आतापर्यंत किती जणांची फसवणूक झाली आहे, याचा पोलीस शोध घेत आहेत.

## सोलापूर रेल्वे स्थानकावर महिलांच्या संशयास्पद हालचाली... सिद्धेश्वर एक्स्प्रेसमध्ये दरोड्याची तयारी

■ **सोलापूर। प्रतिनिधी,**

मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील रेल्वे सुरक्षा बलाने (आरपीएफ) मोठी कारवाई करत मुंबई-सोलापूर सिद्धेश्वर एक्स्प्रेस या गाडीत होणारा दरोड्याचा प्रयत्न हाणून पाडला आहे. महिलांची एक टोळी रेल्वे गाडीत दरोड्याच्या तयारीत होती, मात्र आरपीएफ पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतल्याने पुढील अनर्थ टळला आहे. एकूण नऊ महिला संशयित आरोपींना अटक करून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी कुडुर्वाडी रेल्वे स्थानकावर क्राईम प्रिव्हेन्शन अँड डिटेक्शन स्क्वॉड (सीपीडीएस) पथकाचे हेड कॉन्स्टेबल शिवाजी मुंडे यांनी तीन महिलांना संशयास्पद अवस्थेत फिरताना पाहिले. त्यांच्याकडे चौकशी करून त्यांना रेल्वे स्थानक सोडण्यास सांगितले होते. मात्र संशयित महिलांची टोळी लातूर एक्स्प्रेसमध्ये चढली होती. त्यामुळे कुडुर्वाडी आरपीएफने सोलापूर आरपीएफ विभागाला सतर्कतेचा इशारा दिला होता.

### आरपीएफने आवळल्या टोळीच्या मुसक्या



संशयित महिलांची टोळी जेऊर स्थानकावर उतरून दरोड्याच्या उद्देशाने मुंबई-सोलापूर सिद्धेश्वर एक्स्प्रेसमध्ये चढली. सतर्क असलेल्या आरपीएफने तत्काळ कारवाई केली. सिद्धेश्वर एक्स्प्रेसमधील एस्कॉर्टिंग पथकातील हेड कॉन्स्टेबल हरमेंद्र प्रसाद मीना आणि कॉन्स्टेबल ब्रजेश यादव यांना सतत माहिती देण्यात येत होती. संशयितांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी त्यांचे फोटो आणि प्रवाशांकडून मिळालेल्या माहितीद्वारे देखरेख करण्यात आली. सोलापूर स्थानकावर कॉन्स्टेबल सोनम पठाण यांच्यासह आरपीएफची विशेष टीम सज्ज होती. रेल्वे स्थानकावर पोहोचताच सर्व महिला आरोपींना ताब्यात घेतले. या महिला १८ ते ४० वयोगटातील असून धाराशिव जिल्ह्यातील रहिवासी असल्याची माहिती समोर आली आहे.

दरम्यान, धावत्या रेल्वेत दरोडा घालणारी महिलांची टोळी सोलापूर व पुणे विभागांत सक्रिय असल्याची शक्यता व्यक्त केली आहे. याबाबतची माहिती पुणे विभागालाही देण्यात आली आहे. प्रवाशांनी सतर्क राहून कोणतीही संशयास्पद हालचाल दिसल्यास तत्काळ रेल्वे प्रशासनाला माहिती देण्याचे किंवा मदतीसाठी १३९ या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# भरकटलेले युद्ध!



युद्धात शत्रूला गाफील किंवा बेसावध ठेवून स्वतःचे ईप्सित साध्य करायचे असते, हा युद्धाचा सर्वसाधारण नियम आहे. तथापि डॉनल्ड ट्रम्प यांच्या वागण्या-बोलण्यात तो दिसत नाही. ते प्रथमपासून विजयी झाल्याच्या आविर्भावातच आहेत. प्रत्यक्षात इराण अजूनही पूर्णपणे पराभूत झालेला नाही. या युद्धात इराणची अतोनात हानी झाली, हे निश्चित; पण तो अद्याप संपलेला नाही, हेही तितकेच सत्य! या युद्धात इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला खामेनी यांच्यासह अन्य काही वरिष्ठ नेत्यांना मारणे, तसेच काही ठिकाणांवरची आक्रमणे वगळता अमेरिका आणि इस्रायल यांच्या हाती ठोस काही लागले आहे, असे चित्र दिसत नाही. शत्रूला अर्धमेला ठेवणे, म्हणजे स्वतःच्या अंताला निमंत्रण देण्यासारखे असते, हे किमान ट्रम्प यांच्यासारख्या युद्धखोर नेत्यांना तरी ठाऊक असायला हवे. सध्या ज्या पद्धतीने हे युद्ध लांबणीवर पडत आहे, असे म्हणण्यापेक्षा ते पाडले जात आहे, ते पहाता अनेक प्रश्न निर्माण होतात. 'अमेरिकेला खरोखरच या युद्धातून काय साध्य करायचे आहे?', असा प्रश्न आता अमेरिकेतील जनताच विचारू लागली आहे. ज्या तडफेने ट्रम्प यांनी हे युद्ध चालू केले, त्याची दुप्पट संथगती सध्या त्यांच्या हालचालींत का दिसत आहे? या युद्धाने अमेरिकेची तिजोरी मोठ्या प्रमाणात रिकामी केली आहे, ती आणखी रिकामी होऊ न देण्यासाठी अमेरिका सध्या वेळकाढूपणा करत आहे का? त्यातच ट्रम्प हे इराणला सध्या धमक्या देण्यापलीकडे काहीही करतांना दिसत नाहीत. इराणला दिलेली युद्धविरामाची २२ एप्रिल ही समयमयार्दाही त्यांनी पुन्हा वाढवून दिली आहे. बरोबर एक महिन्यापूर्वी इराण-अमेरिका चर्चा फिस्कटली होती. गेल्या एक महिन्यातील ट्रम्प यांच्या वागण्या-बोलण्याचे बारकाईने निरीक्षण केले, तर त्यांची अस्वस्थता स्पष्टपणे जाणवते. युद्ध लांबणीवर पडत चालल्यामुळे अनेक देशांवर त्याचा विपरीत परिणाम होत आहे. त्याचाही दोष ट्रम्प यांनाच दिला जात आहे. देशांतर्गत नागरिक अगोदरच विरोधात आहेत. 'नाटो'ने अमेरिकेच्या बाजूने लढण्यास नकार दिला आहे. त्यात तेलविक्री काही अंशी थांबल्याने तोही तोटा सहन करावा लागत आहे. त्यात भरीस भर म्हणून इस्रायलचा दबाव आणि मुख्य, म्हणजे इराण पराभव मान्य करायला सिद्ध नाही. अशात प्रचंड दबावाच्या ओज्याखाली दबल्यामुळे अस्वस्थ होणे साहजिकच आहे. ट्रम्प यांना आणखी एक पुष्कळ वाईट सवय आहे, ती म्हणजे खोटे बोलणे, दिशाभूल करणे आणि मोहोळ उठवून देणे. आता याला ते युद्धाचा भाग मानत असतील, तर त्यांच्या सल्लागाराचे प्रथम कान धरले पाहिजेत. गेल्या एक महिन्यापासून ते अधिक असंबद्ध बोलतांना दिसत आहेत. 'इराणने आम्हाला युरेनियमचा साठा देण्याचे मान्य केले आहे', 'इराणलाही युद्ध नकोच आहे. त्याने पराभव मान्य केला आहे', 'तो हॉर्मुझ उघडण्याला सिद्ध आहे', असे एक ना अनेक दावे या माणसाने केले आहेत. परिणामी उघडलेली हॉर्मुझ सामुद्रधुनी इराणने पुन्हा बंद केली. याला सर्वस्वी ट्रम्प यांचे विक्षिप्त वागणे कारणीभूत आहे. हे युद्ध लांबणीवर पडण्यामागे केवळ सैनिकी कारणे नसून राजकीय आणि आर्थिक गणितेही मोठ्या प्रमाणात आहेत. अमेरिकेसारख्या महासत्तेसमोर रणांगणावर युद्ध करतांना ते जिंकण्यासह जागतिक पातळीवर स्वतःची प्रतिमा, प्रभाव आणि आर्थिक वर्चस्व टिकवण्याचे आव्हान असते. असे असेलही; पण त्याचा भुर्दंड इतर देशांना कशासाठी? सध्या ट्रम्प ना युद्ध करत आहेत, ना चर्चा! मग आता चालू असलेल्या संघषार्ला म्हणायचे काय? 'युद्ध दीर्घकाळ चालू ठेवून शत्रूची शक्ती हळूहळू क्षीण करणे', हा ट्रम्प महोदयांचा उद्देश आहे, असे मानले, तरी प्रत्यक्षात चित्र तसे दिसत नाही. उलट इराणला स्वतःला सावरण्यासाठी पुरेसा वेळ मिळाला आणि तेवढ्यात त्याने नव्या जोमाने युद्धाची सिद्धता केली, असेच सध्याचे चित्र आहे. या सर्व कालावधीमध्ये अमेरिका निश्चितपणे वरचढ ठरली असली, तरी 'नॅरेटिव्ह वॉर'मध्ये इराणने बाजी मारली आहे. अमेरिकेची प्रतिमा मलिन करण्यापासून ट्रम्प यांना खलनायक ठरवण्यापर्यंत कुठलीही कसर इराणने सोडलेली नाही. ही परिस्थिती ट्रम्प यांची अस्वस्थता आणखी वाढवणारी आहे. दुसरीकडे ज्याच्यामुळे हे युद्ध चालू झाले, असा इस्रायल मात्र स्वतःचे ईप्सित अगदी व्यवस्थितपणे साध्य करतांना दिसून येत आहे. इस्रायलच्या मुळावर पॅलेस्टाईन आल्यावर इस्रायलने पॅलेस्टाईनचे पार कंबरडे मोडले. त्यानंतर पॅलेस्टाईनला ज्यांनी ज्यांनी साहाय्य केले, त्यांनाही इस्रायल वेचून वेचून ठार मारत आहे. अशात लेबनॉनमधील 'हिजबुल्ला' या जिहादी आतंकवादी संघटनेने इस्रायलला आव्हान दिल्यामुळे इस्रायलने तिचा खात्मा करण्याचा विडा उचलला आहे. इस्रायलविरुद्ध उभे ठाकर्णाया सर्व आतंकवादी संघटनांना इराण निधी पुरवत असल्याने त्याला लक्षात राहील, असा धडा शिकवणे इस्रायलसाठी क्रमप्राप्त होते. त्यासाठी इस्रायलने इराणचा पारंपरिक शत्रू असलेल्या अमेरिकेची साथ घेतली. सध्या इराण-अमेरिका यांच्यात युद्धविराम असला, तरी इस्रायलला विरामासाठी वेळ कुठे आहे? त्याने सांगून त्याच्या शत्रूवर आक्रमणे चालूच ठेवली आहेत, म्हणजे इस्रायल त्याच्या ध्येयापासून जराही मागे हटलेला नाही, हे सिद्ध होते. अर्थात यात इस्रायलचीही मोठी हानी झाली आहे; पण त्याच्या अस्तित्वाच्या आव्हानासमोर ही हानी क्षुल्लक ठरवली आणि आज तो शत्रूला चारीमुंड्या चीत करण्याच्या जवळपास येऊन पोचला आहे. याला म्हणतात 'युद्धनीती'! याउलट अमेरिकेच्या धोरणात मात्र सातत्याचा अभाव प्रकषार्ने जाणवतो. ट्रम्प यांना युद्ध जिंकायचे कि केवळ दबाव निर्माण करायचा आहे?, याचाच नेमका त्यांचा निर्णय झालेला दिसत नाही. अशा अर्धवट भूमिकेमुळे ना निर्णायक विजय मिळतो, ना दीर्घकालीन स्थैर्य लाभते; पण संसाधनांचा अपव्यय आणि मानवी हानी मात्र मोठ्या प्रमाणात होते. परिणामी जागतिक पातळीवर अनिश्चितता वाढत जाते आणि त्याचे आर्थिक, राजनैतिक, तसेच सामाजिक परिणाम स्वतःच्या देशासह इतरही सर्व देशांना भोगावे लागतात. स्वतःची दिशा भरकटत आहे, हे अमेरिकेला जितक्या लवकर उमगेल, तितकेच तिच्यासाठी ते हिताचे ठरेल. अन्यथा हे लांबलेले युद्ध तिची प्रतिमा आणि सामर्थ्य यांना गालबोट लावणारे ठरेल. दीर्घकाळ चालणाऱ्या या संघषार्मुळे मित्रदेशांचाही संयम सुटू शकतो आणि जागतिक समीकरणे झपाट्याने पालटू शकतात. दीर्घकाळ चालणारे युद्ध अंततः जय-पराजयातील रेषा पुसून टाकते. अशा संघर्षातून खऱ्या अर्थाने विजयी कुणी होत नाही. उलट अस्थिरतेचे सावट अधिक गडद होत जाते. रशिया-युक्रेन युद्ध याचे उत्तम उदाहरण आहे. त्यामुळे अमेरिका-इराण संघर्ष जितक्या लवकर संपेल, तितके ते जगासाठी हिताचे आहे!

# जनतेच्या प्रातिनिधिक उद्रेकाचा भाजपला दणका

**नारीशक्ती वंदन अधिनियम (१३१ वी घटनादुरुस्ती) आणि मतदारसंघ पुनर्रचना विधेयक संसदेत नामंजूर झाल्यानंतर विरोधकांच्या निषेधार्थ भाजपने रस्त्यावर उतरून मोर्चे आणि आंदोलने करून स्वतःचे हसे करून घेतले. वरळी येथे मंगळवारी २१ एप्रिल रोजी भाजपच्या जनआक्रोश मोर्चादरम्यान संतप्त महिलेने मंत्री गिरीश महाजनांसह पोलीस अधिकारी, कर्मचार्यांसह आंदोलकांनाही जाहीरपणे थेट खडेबोल सुनावले. हा एका महिलेचा नव्हे तर सगळ्या मुंबईकरांचा प्रातिनिधिक उद्रेक होता. कारण मोर्चे काढून रस्ते अडवणे कुणालाच पटलेले नाही.**

संसदेसह राज्यांच्या विधिमंडळांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्यासाठी नारीशक्ती वंदन अधिनियम (१३१ वी घटनादुरुस्ती) आणि मतदारसंघ पुनर्रचना विधेयक सत्ताधारी भाजप आणि मित्र पक्षांनी आणले. त्यासाठी संसदेचे विशेष अधिवेशनही भरविण्यात आले. परंतु, संसदेत ते काही मंजूर होऊ शकले नाही. महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याच्या मुद्द्यावर विरोधकांचाही पाठिंबा होता. मात्र, यास संलग्न असलेल्या मतदारसंघ पुनर्रचनेच्या मुद्द्याला विरोधकांनी जोरदार आक्षेप घेतला. याबाबत घटनादुरुस्ती करायची असल्याने लोकसभेतील दोन तृतीयांश खासदारांचा पाठिंबा आवश्यक होता. परंतु, विरोधकांनी विधेयकाविरोधात मतदान केल्याने ते मंजूर होऊ शकले नाही. त्यानंतर मात्र सत्ताधारी सातत्याने विरोधकांनी महिलांच्या आरक्षणात खोडा घातल्याचे ढोल सर्वत्र बडवू लागले. अगदी विधेयक नामंजूर झाल्याच्या क्षणापासून संसद परिसरापासून विरोधकांच्या निषेधार्थ सत्ताधाऱ्यांकडून मोर्चे काढण्यात येऊ लागले. दिल्लीपासून सुरू झालेले मोर्चे देशभरातील महत्त्वाच्या शहरांच्या अगदी गल्ल्यांमध्येही निघण्यास सुरुवात झाली. मुंबईतील वरळी येथेही मुंबई भाजपच्या वतीने जनआक्रोश मोर्चाचे आयोजन केले होते. महिला आरक्षणामध्ये खोडा घालर्णाया विरोधकांच्या निषेधार्थ मोर्चे, आंदोलने करण्याचा सत्ताधाऱ्यांचा मानस होता. परंतु, भाजपवाले येथे करायला गेले एक आणि झाले भलतेच, अशी परिस्थिती होऊन बसली. महिलांच्या आरक्षणाच्या मुद्द्यावर मोर्चा असतानाही वरळीतील एका संतप्त महिलेने सत्ताधारी भाजपच्या या कृत्यावर जोरदार आक्षेप घेतला.

ही महिला नेमकी कोण आहे, याबाबत काही माहिती पुढे आलेली नाही. परंतु, त्या संतप्त महिलेने भाजपच्या या जनआक्रोश मोचार्मुळे मुंबईकरांना नेमक्या कोणत्या भयंकर त्रासाला सामोरे जावे लागत आहे, याची कैफियत जाहीरपणे मांडली आहे. त्यामुळे तिला फक्त मुंबईतूनच नव्हे देशभरातून मोठे समर्थन मिळत आहे. भाजपच्या जनआक्रोश मोर्चामुळे गेल्या दीड ते दोन तासांपासून वाहतूक कोंडीत अडकल्याचा संताप महिलेने आपल्या भावना व्यक्त केल्या. आपल्या वाहनामधून उतरून तिने थेट रस्त्यावर येऊन मोर्चेकऱ्यांना सुनावण्यास सुरुवात केली. येथून निघून जा, असे ती संतापाने ओरडून सांगत होती. जवळपास दीड ते दोन तासांपर्यंत मोर्चेकर्त्यांनी रस्ता रोखून धरल्याने आपल्या लहानग्या मुलाला शाळेतून आणता आलेले नसल्याने त्या मातेचा संताप अनावर झाल्याचे सांगण्यात येते. आपल्या पोटच्या गोळ्याला होणारा त्रास कोणतीही माता सहन करणार नाही. या त्रासातूनच त्या मातेच्या संतापाचा उद्रेक झाला. या उद्रेकास हजारोंच्या संख्येने आक्रोश करर्णाया आंदोलनकर्त्यांच्या विरोधाचे अजिबात भय वाटले नाही. आंदोलनकर्त्यांचे काय पोलीस अधिकारी, कर्मचारी यांनाही तिने सुनावण्यास मागे-पुढे पाहिले नाही. चक्क मंत्री गिरीश महाजन यांना तिने गाठत येथून चालते व्हा, असे सांगण्यासही मागे-पुढे पाहिले नाही. याबाबतचे व्हिडिओ समाजमाध्यमांवर प्रसारित होताच समस्त मुंबईकरांनी यास आपल्या अजेंड्यावर आणले. सर्वसामान्य माणसांमधून तिला जोरदार पाठिंबा मिळू लागला. तर, सत्तार्धायांना येथेही टीकांचा भडिमार सोसावा लागला. विरोधकांना तर आयते कोलीतच मिळाले. महाराष्ट्राच्या इतिहासात पहिल्यांदाच एका मंत्र्याला जाहीरपणे थेट रस्त्यावर एका महिलेने सुनावण्याचा हा पहिलाच लाजिरवाणा प्रकार असल्याची टीका विरोधक करू लागले आहेत. यापूर्वी महाराष्ट्रात असे कधीच घडले नाही. मात्र, मंत्र्यांविरोधात सर्वसामान्यांचा जनक्षोभ आता थेट रस्त्यावर दिसू लागला आहे. आपले नेमके काय चुकते आहे, याचा विचार करण्याची वेळ सत्ताधाऱ्यांवर आलेली आहे.

खरे तर सत्ताधाऱ्यांनी आपण सत्तेत असतानाही वारंवार या ना त्या मुद्द्यांवर मोर्चे, आंदोलने का करत आहोत? खरंच आपल्याला याची गरज का भासत आहे, याबाबत आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. जो पक्ष गेल्या १२ वर्षांपासून केंद्रात सत्तेत आहे, त्या पक्षाला विरोधकांना प्रत्युत्तर देण्यासाठी आंदोलने करण्याची गरज भासणे म्हणजे, हे सत्ताधाऱ्यांचे सर्वात मोठे अपयश असून आणखी दुसरे काही नाही. ज्यांच्या हाती सत्तेच्या चाव्या असतात त्यांच्याकडे सर्वसामान्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी काम करण्याची जबाबदारी असते. विरोधकांच्या हाती सत्ता नसते. त्यामुळे जनतेची कामे करण्याचा अधिकार त्यांना नाही. त्यामुळे आपसूकच जबाबदारीही त्यांची नाही. जनतेची कामे पूर्ण करण्याबाबत ते मागणी जरूर करू शकतात. मागणी पूर्ण होत नसेल तर सरकारचे लक्ष वेधण्यासाठी मोर्चे, आंदोलने करणे हे सर्वसाधारणपणे विरोधकांचे कामच असते. जनतेची कामे करण्याची जबाबदारी सर्वस्वी सत्तार्धायांचीच असते. विरोधकांनी आंदोलन करण्याआधी आपणच आंदोलने करायची किंवा विरोधकांच्या आंदोलनांना आंदोलनांतूनच प्रत्युत्तर द्यायचे, ही रणनीती प्रत्येक ठिकाणी यशस्वी होणार नाही, हे सत्ताधाऱ्यांनी लक्षात घ्यायला हवे. गेल्या काही वर्षांपासून सत्ताधारी भाजप आखत असलेली ही रणनीती आता नागरिकांच्या लक्षात येण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे लोकशाही शासन प्रणालीत भाजप आपली विश्वासार्हता गमावून बसत आहे.

संबंधित महिलेने मंत्री गिरीश महाजनांसह समस्त मोर्चेकरी आणि पोलिसांसमक्ष जे मुद्दे उपस्थित केले, तेही लक्षात घेणे गरजेचे आहेत. त्या महिलेने थेट मंत्री गिरीश महाजनांना जाब विचारला की, तुम्ही येथे रस्त्यावर का बोलत आहात? जवळच जांबोरी मैदान आहे तेथे तुम्ही हे आंदोलन का करत नाहीत? केवळ रस्ते अडवून मोर्चे, आंदोलने करण्यात काय अर्थ आहे, असा जाब तिने विचारला. तिचे म्हणणे हे अनेक मुंबईकरांना पटले. कारण, दिल्लीतील शाहीन बाग आंदोलनावेळीही सुप्रीम कोटार्ने आंदोलनकर्त्यांना सार्वजनिक ठिकाणे वेठीस धरता येणार नसल्याचे बजावले होते. सर्वसामान्यांना त्रास होईल, अशा कोणत्याही ठिकाणांवर आंदोलनांसाठी परवानगी देण्यात येऊ नये, असे आदेश त्यावेळी कोर्टाने सरकारी यंत्रणांना दिले होते. अगदी मुंबईत झालेल्या मराठा आंदोलनावेळीही मुंबई हायकोटार्ने याची आठवण करून दिली होती. त्यामुळे रस्ते अडवून मोर्चे आणि आंदोलनासाठी परवानगी कशी काय दिली जाते, असा आक्षेप तिचा होता. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनीही हाच मुद्दा उपस्थित करत पोलिसांवर निशाणा साधला आहे. आम्हाला आंदोलनासाठी आझाद मैदानाशिवाय इतर कोठेही परवानगी दिली जात नाही. परंतु, केवळ सत्तार्धायांनाच कशी रस्त्यांवर मोर्चे काढण्यासाठी परवानगी दिली जाते, याचे उत्तर त्यांनी मुंबई पोलिसांकडे मागितले आहे. मराठा आंदोलनासह विरोधकांच्या मतदारयादी घोळाविरोधात जेव्हा मोर्चे काढले जात होते, तेव्हा परवानगी नाकारण्यात आली. परंतु, केवळ सत्ताधारी भाजपच्या जनआक्रोश मोर्चाला परवानगी कशी काय मिळते, असाही प्रश्न उपस्थित करण्यात येऊ लागला आहे.

संसदेत महिला आरक्षणाच्या मुद्द्यावर बोलताना काँग्रेसच्या खासदार प्रियांका गांधी यांनी वारंवार फसवणूक करर्णायांना महिला बरोबर ओळखतात, असे विधान केले होते. प्रियांका गांधी यांचे हे म्हणणे तंतोतंत खरे असल्याची प्रचिती येऊ लागली आहे. कारण, रस्ते बंद झाल्याचा त्रास हा अनेक मुंबईकरांना झाला. परंतु, त्याविरोधात कोणीच आवाज उठवला नाही. भाजपच्या जनआक्रोश मोर्चाविरोधात एका महिलेनेच जाहीरपणे संताप व्यक्त केला. कोणाच्याही पाठिंब्याशिवाय तिने एकट्यानेच पुढे येण्याची हिंमत दाखवली. भाजपच्या मोर्चात पुरुषांप्रमाणेच महिलांचाही मोठ्या प्रमाणात समावेश होता. त्या सर्व महिला जर एकत्रितपणे आंदोलनकर्त्या महिलेला विरोध करण्यासाठी आक्रमक होऊन पुढे आल्या असत्या तर कदाचित परिस्थिती काही वेगळी झाली असती. परंतु, त्या महिलेचा संतापच इतका तीव्र होता की, तिच्यापुढे येण्याची हिंमत कोणाचीच झाली नाही. तिने कोणालाही जुमानले नाही. मंत्री, पोलीस या सर्वांना तिने इतके जबरदस्त सुनावले की, कोणीही भाजपच्या महिला नेत्या, कार्यकर्त्या तिला अडविण्यासाठी पुढे आल्या नाहीत. इतरवेळी त्या विविध मुद्द्यांवर आक्रमक भूमिका घेताना दिसतात. परंतु, यावेळी मात्र सर्व जण तिच्यापासून चार हात लांब अंतर बाळगूनच होते. काही पुरुष मंडळींनी तिला समजावून सांगण्याचा प्रयत्न जरूर केला. परंतु, त्याने काही फरक पडला नाही. रस्ते अडवून मोर्चे काढणे साफ चुकीचे असल्याच्या एकाच मुद्द्यावर ती ठाम राहिली. संतप्त महिलेची आक्रमकताच इतकी होती की, पोलिसांनाही तिने ठोसपणे जाब विचारला. सर्वसामान्यांसाठी तिने घेतलेल्या या भूमिकेचे मुंबईकरांकडून स्वागत करण्यात येत आहे. कारण अनेकांच्या मनात जी भावना होती ती त्या महिलेने बोलून दाखवली होती. राजकीय नेत्यांच्या गाड्यांच्या ताफ्यासाठी बराच काळ रस्ता अडवून ठेवल्यामुळे लोकांचे प्रचंड हाल होतात. अशा वेळी ट्रॅफिकमध्ये एखादी ॲम्ब्युलन्स गाडीही पुढे जाऊ शकत नाही. त्यात एखादा गंभीर रुग्ण किंवा गर्भवती महिला असेल तर काय पंचाईत होते याचा अनुभव लोकांनी घेतलेला आहे. त्यामुळे यापुढे तरी राजकीय नेत्यांनी काही शहाणपण शिकावे. कारण त्या महिलेचा संताप तिचा एकटीचा नाही तर सगळ्याच मुंबईकरांचा आहे.



# सर्वपक्षीयांसाठी सणसणीत चपराक

राजकारणात लोकांचा आवाज ऐकला जातो, असे नेहमी सांगितले जाते; पण काही वेळा तो आवाज ऐकूनही न ऐकल्यासारखे केले जाते. मात्र, कधी कधी तोच आवाज इतका तीव्र होतो की तो केवळ एका घटनेपुरता मर्यादित राहत नाही, तर संपूर्ण व्यवस्थेवर आरसा धरतो. मुंबईतील जांबोरी मैदान परिसरात महिला आरक्षण विधेयकाच्या पार्श्वभूमीवर काढण्यात आलेल्या भाजपच्या जनआक्रोश मोर्चादरम्यान घडलेली घटना याचेच ठळक उदाहरण म्हणावे. एका सामान्य महिलेचा संताप, तिचा स्पष्ट आणि निर्भीड सूर आणि त्यातून उमटलेला संदेश याने संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेतले. या घटनेत मंत्री गिरीश महाजन यांच्यासमोर त्या महिलेचा व्यक्त झालेला संताप हा व्यक्तीविरोधातील नव्हे, तर तो सर्वपक्षीय राजकीय प्रवृत्तीविरोधातील होता. मोर्चा, आंदोलन, सभा ही लोकशाहीची साधने आहेत, याबद्दल दुमत नाही. पण या साधनांचा वापर करताना सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनाचा विचार केला जातो का, हा मूलभूत प्रश्न या प्रसंगातून पुढे आला. रस्ते अडवून, वाहतूक खोळंबा करून, लाखो लोकांच्या रोजच्या आयुष्यात अडथळे निर्माण करून जर राजकीय शक्तिप्रदर्शन केले जात असेल, तर त्यातून निर्माण होणारा रोष अपरिहार्य आहे.

आजच्या काळात सोशल मीडियाची ताकद अशी आहे की, एका क्षणात एखादी घटना संपूर्ण देशभरच नव्हे तर जगभर पोहोचते. या महिलेचा व्हिडिओही तसाच वार्यासारखा पसरला. पण या व्हिडिओचे वैशिष्ट्य हे होते की, तो केवळ व्हायरल झाला नाही, तर त्याला लोकांचा प्रचंड प्रतिसादही मिळाला. लोकांनी त्या महिलेच्या भावना समजून घेतल्या, तिच्या संतापाशी स्वतःला जोडले. मात्र, या प्रतिक्रियेचा अर्थ काही जणांनी आपल्या सोयीप्रमाणे लावण्याचा प्रयत्न केला. विरोधी पक्षांनी या घटनेचा राजकीय फायदा घेण्याचा प्रयत्न केला, ही बाब लपून राहिलेली नाही. भाजपविरोधात लोकांमध्ये असलेला रोष म्हणून या घटनेला रंगवण्याचा प्रयत्न झाला. पण ही मांडणी जितकी सोयीस्कर, तितकीच अपुरी आहे. या संतापामागे कोणत्याही विशिष्ट पक्षाविरोधातील भावना नव्हती, तर ती होती व्यवस्थेच्या त्या वृत्तीविरोधातील प्रतिक्रिया, जिथे जनतेच्या सोयीपेक्षा राजकीय कार्यक्रमांना प्राधान्य दिले जाते.


ही बाब केवळ सत्ताधाऱ्यांपुरती मर्यादित नाही. काँग्रेस असो, शरद पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस असो, उबाठा पक्ष असो किंवा इतर कोणतेही राजकीय गट असोत. सर्वांनी वेळोवेळी असे मोर्चे, आंदोलने आणि रस्ते अडवण्याचे प्रकार केले आहेत. त्यामुळे या घटनेचा वापर करून केवळ एका पक्षावर टीका करणे म्हणजे मूळ मुद्द्याकडे दुर्लक्ष करणे होय. प्रश्न कोणाचा मोर्चा आहे, हा नाही. तर तो कसा काढला जातो आणि त्याचा परिणाम कोणावर होतो, असा आहे. लोकशाहीत आंदोलनाचा अधिकार आहे, पण त्याचवेळी नागरिकांच्या हक्कांचाही आदर राखणे आवश्यक आहे. रस्त्यावर अडकलेल्या रुग्णवाहिका, प्रसव वेदनेत तळमळणारी महिला, वेळेवर पोहोचू न शकलेले कामगार, परीक्षेला उशीर झालेली मुले या सगळ्यांचा विचार कोण करणार? राजकीय पक्षांनी आपल्या शक्तिप्रदर्शनाच्या नादात या प्रश्नांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे. यामुळेच हा उद्रेक त्या महिलेच्या संतापातून व्यक्त झाला. कधी तरी हे होणारच होते. सत्ताधारी म्हणून भाजपकडून अधिक जबाबदारपणाची अपेक्षा आहे.

सत्ता ही केवळ अधिकार देत नाही, तर ती उत्तरदायित्वही वाढवते. अशा वेळी जर त्यांच्या कार्यक्रमांमुळेच नागरिकांना त्रास होत असेल, तर त्याचे गांभीर्य अधिकच वाढते. प्रशासनावर प्रभाव असताना, पर्यायी मार्गाची व्यवस्था, वाहतूक नियंत्रण आणि नागरिकांच्या सोयींचे नियोजन करणे शक्य असते. पण ते न करता जर केवळ गर्दी जमवणे आणि शक्ती दाखवणे यालाच प्राधान्य दिले गेले, तर तो लोकशाहीचा अपमान ठरतो. त्याचवेळी, विरोधी पक्षांची भूमिकादेखील तितकीच महत्त्वाची आहे. काँग्रेसचे नेते नाना पटोले आणि उबाठाचे नेते संजय राऊत या प्रकरणात भाजपवर टीका करण्यात धन्यता मानत आहेत. सत्तार्धायांवर टीका करणे हे त्यांचे कर्तव्य असले तरी राजकीय नेते म्हणून आपण सगळे एकाच पाण्यातील मासे आहोत याचा त्यांना विसर पडत आहे. केवळ एखाद्या घटनेचा राजकीय फायदा उचलण्याच्या नादात जर मूळ मुद्दाच बाजूला पडला, तर ती टीका प्रभावहीन ठरते. या प्रकरणातही तेच झालेले दिसते. त्या महिलेचा राग समजून घेण्याऐवजी, तो आपल्या राजकीय फायद्यासाठी वापरण्याची घाई दिसून आली.

या संपूर्ण प्रकरणातील सर्वात लाजिरवाणी आणि संतापजनक बाब म्हणजे, मंत्र्यांना जाब विचारर्णाया त्या महिलेच्या आवाजाला उत्तर देण्याऐवजी काही महाभागांनी तिच्याच चारित्र्यावर घाव घालण्याचा उद्योग सुरू केला आहे. सार्वजनिक जीवनात प्रश्न विचारणे हा नागरिकांचा मूलभूत अधिकार असताना, त्या अधिकाराचा वापर करर्णाया महिलेची बदनामी करून तिचा आवाज दाबण्याचा हा प्रकार अत्यंत घातक आणि निषेधार्ह आहे. सोशल मीडियाच्या अराजक जगात एका तोंडाळ महिलेचे अश्लील भाषेतील व्हिडिओ पुढे करून जणू तीच 'संतप्त महिला' असल्याचे भासवण्याचा प्रयत्न केला जात आहे. ही केवळ दिशाभूल नाही, तर जाणीवपूर्वक रचलेली बदनामीची मोहीम आहे.

विशेष म्हणजे, ज्या महिलेने संताप व्यक्त केला तिची खरी ओळखही अधिकृतपणे समोर आलेली नसताना, तिच्यावर अशा प्रकारे चिखलफेक केली जाणे हे तिच्या वैयक्तिक सन्मानावर केलेले थेट आघात आहेत. हा प्रकार समाजातील त्या विकृत मानसिकतेचे द्योतक आहे. जिथे स्त्रीने आवाज उठवला की तिच्या चारित्र्यावर प्रश्नचिन्ह उभे करून तिला गप्प बसवले जाते. अशा प्रवृत्ती लोकशाहीच्या मुळांनाच पोखरत असतात. त्या मुद्द्यांवर चर्चा करण्याऐवजी व्यक्तीला लक्ष्य केले जाते. भाजपच्या नेत्यांना उद्रेकाचा फटका बसला म्हणून विरोधी पक्षातील नेते खुशीत गाजरे खात आहेत, पण त्यांना हे कळत नाही की, सर्वसामान्य नागरिकांच्या वतीने त्या महिलेने ती सर्व पक्षीयांच्या निर्ढावलेपणाला दिलेली सणसणीत चपराक आहे.


# विकासाचा महाकुंभ की राजकीय आखाडा




**'सिंहस्थ कुंभमेळा' अवघ्या १५ महिन्यांवर येऊन ठेपला आहे. ३५ हजार कोटींच्या विकास आराखड्यामुळे नाशिकच्या कायापालटाची चिन्हे दिसत असतानाच, प्रशासन आणि लोकप्रतिनिधींमधील विसंवादाने या 'विकास कुंभा'ला राजकीय संघर्षाचे ग्रहण लागते की काय, अशी भीती निर्माण झाली आहे.**

आगामी १५ महिन्यांवर येऊन ठेपलेल्या नाशिक सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीने आता वेग घेतला आहे. मात्र, या तयारीच्या सोबतीनेच शहरातील विकासकामांवरून महापालिका प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यातील मतभेदही उफाळून येऊ लागले आहेत. नाशिकच्या विकासासाठी मैलाचा दगड ठरणारा हा कुंभमेळा खऱ्या अर्थाने 'विकास कुंभ' ठरणार की राजकीय संघषार्चा आखाडा, असा प्रश्न सध्याच्या चित्रामुळे निर्माण झाला आहे. हरिद्वार, उज्जैन, प्रयागराज आणि नाशिक-त्र्यंबकेश्वर अशा चारच ठिकाणी दर १२ वर्षांनी कुंभमेळा भरतो. महाराष्ट्रात केवळ नाशिकमध्येच हा सोहळा होत असल्याने संपूर्ण देशाचे लक्ष याकडे लागलेले असते. नाशिकसाठी हा केवळ धार्मिक सोहळा नसून शहराच्या पायाभूत सुविधा पालटणारा एक मोठा 'विकास कुंभ' असतो. यंदा नाशिक आणि त्र्यंबकेश्वरमध्ये सुमारे ३५ हजार कोटींची विकासकामे प्रस्तावित आहेत. त्यातील १३०० कोटींची कामे युद्धपातळीवर सुरू झाली आहेत. दुसऱ्या टप्प्यातील कामेही लवकरच मार्गी लागणार आहेत. कुंभमेळा यशस्वी करण्यासाठी मंत्री गिरीश महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली कुंभमेळा प्राधिकरण, महापालिका आणि प्रशासन प्रयत्नशील आहे; मात्र नियोजनाच्या पद्धतीवरून वादाचे ढग जमा झाले आहेत. आतापर्यंत कुंभमेळ्याच्या नियोजनाची सर्व धुरा नाशिक महापालिकेकडे असायची आणि पालिकेने ती दरवेळी चोख बजावली आहे. मात्र, यंदाचा कुंभमेळा मागील वेळेपेक्षा पाचपट मोठा असण्याचा अंदाज असल्याने शासनाने 'सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरण' स्थापन केले आहे. या प्राधिकरणाच्या माध्यमातूनच कामांची गंगा नाशिकमध्ये अवतरत आहे. मात्र, याच प्राधिकरणाच्या कार्यपद्धतीमुळे स्थानिक लोकप्रतिनिधींमध्ये नाराजीचा सूर उमटला आहे. महापालिका सक्षम असताना बाह्य प्राधिकरणांमार्फत कामे का केली जात आहेत? असा थेट सवाल माजी नगरसेवकांनी उपस्थित केला आहे. या पद्धतीमुळे स्थानिक लोकप्रतिनिधींची भूमिका दुय्यम ठरत असल्याची भावना नुकत्याच झालेल्या बैठकीतव्यक्त झाली. शिंदेसेनेचे गटनेते अजय बोरस्ते यांनी महासभेत अत्यंत आक्रमक पवित्रा घेत, "नगरसेवकांना केवळ 'प्रेक्षक' बनवले जात आहे," असा आरोप केला. शहरात नेमकी काय कामे सुरू आहेत, याची माहिती स्थानिक प्रतिनिधींना दिली जात नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. जर कामादरम्यान एखादी दुर्घटना झाली, तर त्याची जबाबदारी प्रशासन घेणार का? असा रोकडा सवालही त्यांनी विचारला. सिंहस्थाच्या नावाखाली कोट्यवधींच्या योजना जाहीर होत असताना, आपल्याच प्रभागातील छोट्या कामांसाठी निधी मिळत नसल्याचा मोठा असंतोष नगरसेवकांमध्ये दिसून येत आहे. सध्या महापालिकेत प्रशासकीय राजवट आहे. आगामी कुंभमेळ्यासाठी सुमारे आठ कोटी भाविक नाशिकला येतील, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. इतक्या मोठ्या जनसागराचे नियोजन करताना लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांच्यात समन्वय असणे आवश्यक आहे. मात्र, सध्या हा समन्वय हरवल्याचे स्पष्टपणे जाणवत आहे. मध्यंतरी कामांच्या विचारण्यावरून लोकप्रतिनिधींवर 'टक्केवारी'चे आरोपही झाले, जे त्यांनी सभागृहात ऑडिओ क्लिपच्या माध्यमातून खोडून काढले. नागरिक त्यांच्या समस्या घेऊन हक्काने आपल्या नगरसेवकाकडे जातात. मात्र, आता सर्व निर्णय प्राधिकरण घेत असल्याने लोकप्रतिनिधी स्वतःला हतबल समजत आहेत. प्रशासनाने मांडलेला १४ हजार कोटींच्या कामांचा आढावा कौतुकास्पद असला, तरी स्थानिक प्रतिनिधींना विश्वासात घेतल्याशिवाय ही कामे यशस्वीपणे पूर्ण होणे कठीण आहे. आगामी काळात सिंहस्थ कुंभमेळ्याच्या यशस्वितेसाठी प्राधिकरण, लोकप्रतिनिधी आणि मनपा प्रशासन हे सर्व घटक आपले मतभेद विसरून 'नाशिक प्रथम' या भावनेने एकत्र येतील, हीच नाशिककरांची माफक अपेक्षा आहे. केवळ कागदी आराखडे आणि सादरीकरणे करून कुंभमेळा यशस्वी होत नसतो, त्यासाठी जमिनीवर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा आणि स्थानिक अनुभवाचा सक्रिय सहभाग अनिवार्य आहे. जर हा समन्वय वेळीच सुधारला नाही, तर कोट्यवधींचा हा निधी केवळ सिमेंट-काँक्रीटच्या जंगलात रूपांतरित होईल आणि नाशिककरांच्या हाती मात्र नियोजनाचा बोजवारा येईल.

# हार्मोन्सचे संतुलन राखण्यात हे पदार्थ बजावतात मोलाची भूमिका!



**हा**र्मोन्स शरीराला अनेक प्रकारे मदत करतात. ते आपल्या शरीरातील सर्व क्रियांवर सकारात्मक किंवा नकारात्मक परिणाम करू शकतात. म्हणून हे हार्मोन्स संतुलित राखणे आणि शरीर सुस्थितीत ठेवणे अतिशय गरजेचे असते. हार्मोन्स संतुलित राखण्यासाठी सर्वात गरजेचे असते योग्य पदार्थांचे सेवन करणे, जर तुम्ही कोणतेही खाद्य पदार्थ कसेही कोणत्याही वेळेत खात असाल आणि एकंदरीत तुमचे तुमच्या आहारावर नियंत्रण नसेल तर हार्मोन्सची क्रिया बिघडून शरीराला मोठा धोका निर्माण होऊ शकतो. आज आम्ही तुम्हाला काही अशा पदार्थबद्दल सांगणार आहोत ज्यांचे सेवन केल्याने शरीरातील हार्मोन्सचे संतुलन योग्य राहते आणि तुम्ही कित्येक गंभीर समस्यांपासून स्वतःच्या शरीराचा बचाव करू शकता. चला तर जाणून घेऊया या खाद्य पदार्थांबद्दल आणि सोबत याची सुद्धा माहिती घेऊया की हार्मोन्सचे हे संतुलन शरीरासाठी किती गरजेचे आहे.

**हार्मोन्सचे संतुलन का गरजेचे आहे?**

जेवढी आपल्या शरीराला पोषक तत्वांची गरज असते तेवढीच गरज असते शरीरातील हार्मोन्स संतुलित राखण्याची! याकडे दुर्लक्ष करणे आपल्या आरोग्यासाठी खूप धोकादायक ठरू शकते. हार्मोन्सच्या संतुलनामुळेच आपल्या शरीराचे कित्येक अवयव कोणत्याही समस्येशिवाय आपले कार्य अचूक पद्धतीने करत असतात. हार्मोन्स संतुलित ठेवायचे असतील तर सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे पुरेशी झोप घेणे. हा हार्मोन्स संतुलित ठेवण्याचा सगळ्यात सोप्पा मार्ग आहे. या शिवाय आम्ही आधीच सांगितल्याप्रमाणे चांगले खाद्य पदार्थ खाऊन सुद्धा तुम्ही हार्मोन्स संतुलित ठेवू शकता. चला तर जाणून घेऊया त्या खाद्यपदार्थांबद्दल!

- **टोमॅटो** : टोमॅटो हा तर आपल्या रोजच्या आहारातील महत्त्वपूर्ण पदार्थ. टोमॅटोचे सेवन आपण रोज वेगवेगळ्या रुपात करत असतो. कोणी त्याचं सार बनवतो, कोणी भाजी. तुम्ही सुद्धा अजून बऱ्याच रुपात टोमॅटोचे सेवन करत असाल आणि ते केलंच पाहिजे. कारण हार्मोन्स संतुलित राखण्यात मोठी भूमिका हे टोमॅटो बजावतात. टोमॅटोंमध्ये अनेक पोषक तत्वे असतात आणि हीच पोषक तत्वे आपले काम योग्य प्रकारे करून शरीरातील हार्मोन्स संतुलित राखण्यास सहकार्य करतात.
- **पालक** : पालेभाज्यांमधील सगळ्यात जास्त सेवन केली जाणारी भाजी म्हणजे पालक. पालकच्या भाजीचे सेवन हे शरीरासाठी अतिशय गुणकारी आहे आणि म्हणून कित्येक तज्ज्ञ आणि डॉक्टर सुद्धा पालकचे सेवन करण्याचा सल्ला देतात. पालकच्या भाजीमध्ये लोहाची मात्रा मोठ्या प्रमाणात असते. हे लोह तुमच्या शरीरात कधीच रक्ताची कमतरता भासू देत नाही. एका संशोधनानुसार असे सिद्ध झाले आहे की पालकचे सेवन केल्याने हार्मोन्स संतुलित राखण्यासाठी सुद्धा खूप मदत होते. त्यामुळे आपणही पालकचे शक्य तितके सेवन करा.
- **बीट** : बीट म्हणजे जास्तीत जास्त सलाड मधून खाल्ले जाणार फळ. अनेक आरोग्य व फिटनेस तज्ञ उत्तम आरोग्यासाठी बीटाचे सेवन करण्यास सांगतात. कारण बीटामध्ये खूप जास्त पौष्टिक पदार्थ असतात जे आपल्या शरीराला सक्षम राखण्यात मदत करतात. बीट कच्चे खाल्ले किंवा त्याचा ज्यूस करून प्यायल्यास शरीराला सर्वाधिक फायदा होतो तो हार्मोन्स संतुलित राखण्यासाठी. त्यामुळे तुम्ही अजूनही बीट चांगलं लागत नाही म्हणून ते खाण्यास टाळाटाळ करत असाल तर कृपया त्याचे सेवन करणे सुरु करा. ते तुमच्या भल्याचेच ठरेल.
- **लसूण** : लसणामध्ये अँटीडायबेटिक गुण असतात. याव्यतिरिक्त लसणामध्ये एंटीइन्फ्लेमेट्री गुण देखील चांगल्या प्रमाणात आढळतात. याच गुणधर्मांमुळे लसूण हे सूज कमी करणाऱ्या हार्मोनला सक्रीय करण्याचे आणि वाढवण्याचे काम करतात. यामुळे तुमच्या शरीरावरची सूज लवकर कमी होते कारण लसणाचे सेवन केल्याने त्या हार्मोन्सच्या कार्यास चालना मिळते. याशिवाय अन्य हार्मोन्स संतुलित राखण्यासाठी सुद्धा लसूण मोलाची भूमिका बजावते. तर मंडळी हे होते हार्मोन्स संतुलित राखण्याचे फायदे आणि ते पदार्थ जे हार्मोन्स संतुलित राखण्यास सहाय्य करतात. आता तुम्हालाही पुरेपूर माहिती मिळाली असल्याने आपले हार्मोन्स संतुलित राखण्यासाठी वर सांगितलेल्या पदार्थांचे सेवन करा आणि सक्षम राहा. हि माहिती आपल्या ओळखीच्या लोकांपर्यंत सुद्धा पोहोचवा आणि त्यांना देखील हार्मोन्स संतुलित ठेवून निरोगी राहण्यास सहाय्य करा.

# नियमित २ लवंग चघळल्याने होतात 'हे' आश्चर्यकारक फायदे!



**ल**वंग आपल्या घरात आढळणारी एक सामान्य गोष्ट आहे. दैनंदिन आहारात बरेचसे पदार्थ हे लवंगीशिवाय अपुरे आहेत म्हणून प्रत्येक घरात लवंग आढळतेच. केवळ भारतच नाही तर अख्ख्या जगात लवंगीला मोठी मागणी आहे. एका फ्लॉवर बडच्या रुपात लवंग पूर्ण जगात प्रसिद्ध आहे आणि लोक याचा मोठ्या प्रमाणावर वापर सुद्धा करतात. पण मंडळी लवंग केवळ खाद्यपदार्थाला स्वाद आणण्यासाठी वापरली जात नाही तर हिचे काही औषधी गुणधर्म सुद्धा आहेत. अनेक प्रकारच्या आरोग्याच्या समस्यांवर लवंगीचा प्राचीन काळापासून वापर केला जात आहे आणि याचे परिणाम देखील प्रभावशाली आणि जलद दिसून येतात. सर्वात जास्त मौखिक स्वच्छतेसाठी लवंगचा वापर केला जातो. तोंडाशी निगडीत अनेक समस्या लवंग वापरल्याने दूर होतात. आज आम्ही याच लवंगीचे काही अज्ञात गुणकारी फायदे तुम्हाला सांगणार आहोत, याचा वापर तुम्हीही नक्की करून पहा, तुम्हालाही फरक दिसून येईल.

**दातांची वेदना दूर करण्यासाठी** – लवंगीचा सगळ्यात महत्त्वपूर्ण वापर होतो दातांची वेदना दूर करण्यासाठी! दातांमध्ये अचानक कधी कधी वेदना सुरु होतात त्यावेळी लवंगीचा वापर केल्याने आराम मिळतो. यासाठी एक कप पाण्यात लवंग चांगल्या रीतीने पाण्यात उकळवून घ्यावी आणि त्या पाण्याने गुळण्या कराव्यात. आठवड्यातून तीन ते चार वेळेस हि प्रक्रिया केल्यास दातांमधील वेदना जलद गतीने नाहीश्या होतात. त्यामुळे तुम्हाला व ओळखीच्या कोणाला अचानक कधी दातांमध्ये वेदना सुरु झाल्यास लवंगीचा हा उपचार अवश्य करून पाहावा.

**तोंडाची दुर्गंधी** – तोंडाची दुर्गंधी हा अनेकांसाठी आजही चिंतेचा विषय आहे. यामुळे त्यांना कोणासमोर मनमोकळेपणाने बोलताही येत नाही आणि समोरच्या व्यक्तीच्या मनावरही वाईट छाप पडते. मात्र अशी समस्या असल्यास लवंग यावर गुणकारी ठरू शकते. मौखिक स्वच्छतेसाठी विविध प्रकारे लवंगीचा वापर केला जातो. ज्या लोकांच्या तोंडातून दुर्गंधी येते त्यांनी लवंग कुटून ती चावायला सुरुवात करावी. काही दिवसांतच तोंडातील हि दुर्गंधी कायमची नाहीशी होईल. मात्र ज्यांना कोणता मोठा आजार असेल अशा लोकांनी डॉक्टरांचा सल्ला घेऊनच हा उपाय करावा.

**तोंडात फोड येणे** – सामान्यतः तोंडात फोड येण्यामागे कारणीभूत असतं साफ न झालेलं पोट! यापासून बचाव व्हावा म्हणून लोक नाना विविध उपाय करून पाहतात. मात्र कुटून बारीक केलेली लवंग १५ ते २० मिनिटे तोंडात ठेवल्याने तोंडातील फोडांच्या समस्येपासून मोठा आराम मिळतो. जे लोक तोंडातील फोडांच्या समस्येमुळे त्रस्त आहेत त्यांनी बारीक कुटलेली लवंग दिवसातून ३ ते ४ वेळा आपल्या तोंडात १५ ते २० मिनीटांसाठी ठेवावी. असं केल्याने तोंडातील फोडांच्या समस्येपासून लवकर आराम मिळतो.

**मानेचे दुखणे** – तुम्हाला वाचून आश्चर्य वाटलं असेल ना? पण हे अगदी खरं आहे. मानेच्या दुखण्यावर सुद्धा लवंग खूप गुणकारी ठरते. अनेकांना रात्री चुकीच्या झोपण्याच्या स्थितीमुळे मानेचे दुखणे सहन करावे लागते पण यापासून लवंग तुमचा बचाव करू शकते. लवंगीमध्ये शारीरिक वेदना कमी करण्याची मोठी क्षमता असते. १-२ ग्लास पाण्यात १० ते १५ लवंग उकळवून या पाण्याने दुखणाऱ्या भागावर शेक द्यावा. असे केल्याने मानेच्या वेदनेपासून जलद आराम मिळतो. मात्र यापासून सुद्धा वेदना कमी झाली नाही तर मात्र डॉक्टरांचाच सल्ला घेतलेला बरा!

**पोटातील जंत मारण्यासाठी** – पोटातील जंताची समस्या लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांना भोगावी लागते. या जंतांचा वेळीच बंदोबस्त केला नाही तर पोटात वेदना होतातच पण आपल्या शरीराला देखील मोठा धोका निर्माण होतो. आपली पचन क्रिया बिघडून स्थिती हाताबाहेर जाऊ शकते. जेव्हा तुम्हाला वारंवार थुंकावेसे वाटेल किंवा तोंडात जास्त थुंकी जमा होईल तेव्हा समजून जावे की पोटातील जंतांचा धोका वाढत चालला आहे. ज्या लोकांना हि समस्या आहे त्यांनी दिवसातून किमान ३ वेळा लवंगचे सेवन करावे. लवंग या जंतांना मारण्यात मोलाची भूमिका बजावते. याच कारणांमुळे अनेक तज्ञ देखील पोटांतील जंतांवर लवंग खाण्याचा सल्ला देतात.

# उन्हाळ्याच्या दिवसात वापरा हे फेसपॅक

उन्हाळ्याच्या दिवसात सूर्याच्या तिव्र किरणांचा वाईट परिणाम आपल्या त्वचेवर होत असतो. उन्हाळ्याच्या दिवसात त्वचा तेलकट, चिपचिपित होण्यासाठी अनेक कारणं असतात. तीव्र ऊन, घाम, सोबत प्रदुषण, धूर, धूळ यामुळे त्वचेचे नुकसान होते. त्वचेवर ब्लॅकहेड्स, व्हाईटहेड्स येण्याचे प्रमाण वाढते.

सोबतच ॲक्नेचा त्रासही बळावतो. उन्हापासून बचाव करण्यासाठी मुली अनेक प्रकारच्या प्रोडक्टचा वापर आपल्या चेहऱ्यावर करतात. पण या प्रोडक्टमध्ये अनेक प्रकारचे रसायने असतात. सूर्याच्या किरणांपासून बचाव करण्यासाठी तुम्ही घरगुती उपाय करू शकता. घरात फेस पॅक तयार करून तो पॅक तुम्ही तुमच्या चेहऱ्यावर वापरू शकता.

काकडीपासून तयार करू शकता फेसपॅक

काकडीच्या सालींवर साखर लावा. १५ ते २० मिनटे ते फ्रिजमध्ये थंड होण्यासाठी ठेवा. त्यानंतर ते संपूर्ण चेहऱ्यावर व्यवस्थित लावा आणि २० मिनिटांनंतर स्वच्छ पाण्यात चेहरा धुवा.

दही आणि कोरफडचं फेसपॅक

दही आणि कोरफडचं फेसपॅक तयार करताना ४ चमचे कोरफडचं गर आणि १ चमचा दही एकत्रित करून घ्या. हे मिश्रण २० मिनिटांसाठी चेहऱ्यावर राहू द्या. त्यानंतर कोमट पाण्यात चेहरा धुवा.

टोमॅटो आणि मध

टोमॅटोच्या रसा मध्ये १ चमचा मध मिसळा आणि २० मिनिटांसाठी चेहऱ्यावर राहू द्या. अठवड्यातून दोन-तीन वेळा हे फेसपॅक चेहऱ्यावर लावल्यास चेहरा उजळण्यास मदत होईल.



# काळ्या मीठाचे असंख्य फायदे



**पांढऱ्या मिठाच्या तुलनेत काळे मीठ अधिक लाभदायक**

- काळ्या मिठामध्ये लोह आणि खनिजांच्या घटकांसोबत भरपूर प्रमाणात औषधी गुणधर्म देखील आहेत.
- पांढऱ्या मिठामध्ये जास्त प्रमाणात सोडियम असते. सोबतच यामध्ये पोटॅशियम आयोडेट आणि एल्युमिनियम सिलिकेट यांसारखे तत्त्व देखील असतात. हे घटक आरोग्यासाठी अपायकारक असतात.
- याच कारणामुळे आयुर्वेदाचार्यांसह अन्य डॉक्टर देखील आहारामध्ये कमी प्रमाणात मिठाचा समावेश करण्याचा सल्ला देतात.
- तसंच पांढऱ्या मिठासह सॅलेड न खाण्याचाही सल्ला दिला जातो.
- पांढऱ्या मिठाच्या अति सेवनामुळे रक्तदाब आणि हृदयविकार यासारख्या समस्या वाढतात.
- तर काळ्या मिठामुळे आपली पचन प्रक्रिया सुरळीत सुरू राहते आणि आपल्या शरीराची रोगप्रतिकारक शक्ती देखील वाढते.

**काळे मीठ : नॅचरल पेन किलर**

- जी लोक सांधेदुखी, पायांच्या दुखण्यामुळे त्रस्त आहेत, ते काळे मीठ गरम करून पायांना शेक देखील देऊ शकतात.
- या उपायामुळे सांधेदुखीचा त्रास कमी होऊ शकतो.
- पण त्वचेच्या काही समस्या असल्यास हा उपाय करू नये.

**पोटदुखीसाठी लाभदायक**

- जर तुम्हाला पोटदुखीचा खूप गंभीर स्वरुपात त्रास होत असेल तर काळ्या मिठासह ओवा चावून खा. ओवा आणि काळे मीठ चावून पटकन गिळायचे नाही हे लक्षात ठेवा.
- ओव्याची चव कडवट असते. पण यामुळे तुमची पोटदुखी कमी होण्यास मदत मिळते.
- पोटदुखीवर ओवा हे प्रभावी औषध आहे.

**बद्धकोष्ठता आणि गॅस**

- नियमित स्वरुपात सॅलेड किंवा अन्य खाद्यपदार्थांमध्ये काळ्या मिठाचा उपयोग केल्यास तुमच्या गॅस, अपचन तसंच बद्धकोष्ठतेच्या समस्या कमी होण्यास मदत मिळेल.
- पचनच्या समस्या कमी झाल्यास तुमच्या शरीरातील विषारी पदार्थ बाहेर फेकले जाण्यास मदत मिळेल.
- काळ्या मिठामुळे शरीराची पचन प्रक्रिया सुधारते. यामुळे आपल्याला शारीरिक तसंच मानसिक स्वरुपातही आराम मिळतो. कारण यामुळे हॅपी हार्मोन्सचा स्त्राव अधिक प्रमाणात होतो आणि मज्जातंतूचे दुखणे कमी होते.

**मानसिक आरोग्यासाठी लाभदायक**

- काळ्या मिठाच्या सेवनामुळे झोप तसंच मानसिक आरोग्याशी संबंधित असलेल्या असणाऱ्या हार्मोनचा स्तर वाढतो. काळ्या मिठामुळे शरीरामध्ये मेलाटोनिन हार्मोनची पातळी वाढते. यामुळे आपल्याला चांगली आणि गाढ झोप मिळते.
- सोबत सेराटोनिन हार्मोनचा स्त्राव देखील वाढतो. हे हार्मोन आपल्याला तणावमुक्त ठेवण्याचे कार्य करते. तणावमुक्तीमुळे आपल्याला चांगली झोप मिळते. तसंच मेंदूच्या कार्यातही अडथळे निर्माण होत नाहीत.

**केस-त्वचेसाठी काळ्या मिठाचे फायदे**

- कोमट पाण्यामध्ये काळे मीठ टाकून आंघोळ केल्यास कोरडी त्वचा, त्वचेला खाज सुटण्याची समस्या कमी होते. यामुळे सोरायसिस यासारख्या त्वचा विकारांपासून आपली सुटका होण्यास मदत मिळते.
- काळ्या मिठामुळे आपल्या केसांना देखील पोषण तत्त्वांचा पुरवठा होतो. यामुळे केस घनदाट आणि मजबूत होतात. शिवाय, कोरड्या- निर्जीव केसांची समस्या देखील कमी होण्यास मदत मिळते.
- केसगळती, कोंडा देखील कमी होतो.

कोलेस्ट्रॉल

- काळ्या मिठामुळे हृदयविकाराचा धोका कमी होण्यास मदत मिळते.
- यातील पोषण तत्त्वांमुळे कोलेस्ट्रॉल आणि उच्च रक्तदाबाची समस्या नियंत्रणात राहण्यास मदत मिळते.
- ज्यामुळे हृदयविकाराचा झटका आणि स्ट्रोक सारख्या समस्यांचा धोका कमी होतो.

**लहान मुलांसाठी फायदेशीर**

- लहान मुलांच्या शारीरिक तसंच मानसिक विकासासाठी काळे मीठ लाभदायक असते. यामुळे शरीरातील सोडियमची कमतरता भरून निघते.

# संध्याकाळी कधीही खाऊ नका हे पदार्थ नाहीतर वाढेल वजन



**ज**र तुम्ही वजन कमी करण्याच्या प्रयत्नात असाल आणि तर तुम्ही काही गोष्टी कटाक्षाने पाळणं आवश्यक असते. वजन कमी करण्यासाठी वर्कआऊट जितका महत्वाचा आहे. तितकाच महत्वाचा तुमचा आहार आहे. काही जणांना चुकीच्या वेळी खाण्याची सवय असते. म्हणजे नेमका कोणता पदार्थ कधी खावा हे आपल्याला कळत नाही. मग काय चुकीच्या वेळी चुकीचा पदार्थ खाल्ला जातो आणि वजन वाढता वाढता वाढे होतं. मग काय पुन्हा वजन कमी करण्यासाठी डाएट केलं जातं. पण हे सगळं न करता जर तुम्ही थोडी काळजी घेतली योग्य आहार घेतला तर बऱ्याच गोष्टींचा त्रास तुम्हाला होणार नाही.

- **संध्याकाळची भूक** : संध्याकाळची भूक म्हणजे साधारण ४ ते ५ वाजता अशी काय भूक लागते की, यावेळात सगळे काही खावेसे वाटते. अगदी पिज्झा, बर्गर, शेवपुरी, पाणीपुरी, सँडवीच असे जे काही मिळेल ते पोटात ढकलावेसे वाटते. कितीही काहीही केलं तरी या वेळात आवर्जून काहीना काही खाल्लं जातं. अशी भूक लागल्यानंतर नक्कीच तुम्ही खायला हवं. भूक मारणं नक्कीच चांगली गोष्ट नाही. पण जर तुम्ही या वेळात काही योग्य खाल्लं तर तुम्हाला कसलाही त्रास होणार नाही. शिवाय वजनही कमी होण्यास मदत मिळेल.
- **पाव असलेले पदार्थ** : वडापाव, भजीपाव, पावभाजी, सँडवीच असे पदार्थ दिसले की, ते खाण्याचा मोह अजिबात आवरता येत नाही. चटपटीत चमचमीत असे हे पदार्थ असतात. पण त्यासोबत दिला जाणारा पाव हा तुमच्यासाठी घातक आहे. मुळात डाएटच्या नियमांमध्ये पाव खाणे हे बसत नाही. संध्याकाळी पाव खाल्ल्यानंतर तो पचण्यास ही कठीण जातो. हे पदार्थ खाल्यानंतर जेवण जेवावेसे वाटत नाही. त्यामुळे संध्याकाळच्या भुकेला पाव अजिबात खाऊ नये.
- **चीझ असलेले पदार्थ** : हल्ली नाक्या नाक्यावर आणि गल्लीबोळात चमचमीत पिज्झा, बर्गर, फ्राईज असे पदार्थ मिळतात. यामध्ये भरभरुन चीझ घातलेलं असतं. डाएटमध्ये असताना चीझ खाऊ शकत नाही असे नाही. तुम्ही नक्कीच चीझ खाऊ शकता. पण संध्याकाळी चीझचे सेवन केल्यानंतर ते पचायला कठीण जाते. शिवाय संध्याकाळी शरीराच्या सगळ्या क्रिया मंदावलेल्या असतात. त्यामुळे तुम्ही संध्याकाळी चीझ खाणे टाळायला हवे.
- **मैदा असलेले पदार्थ** : मैदासुद्धा तुमच्या शरीरातील फॅट वाढवू शकतं. फॅटसोबतच मैदा पचायलाही फार वेळ लागतो. मोमोज, नुडल्स असे काही पदार्थ संध्याकाळच्या भुकेला पोटभरीचे वाटतात खरे पण हेच पदार्थ अधिक त्रासदायक ठरु शकतात. हल्ली अनेक पदार्थांमध्ये मैद्याचा वापर केला जातो. पण हा मैदा पचण्यास कठीण जातो. त्यामुळे तुम्ही हे पदार्थ अजिबात खाऊ नका. याशिवाय मैद्याशी संबधित अनेक पदार्थ हे तेलकट असतात हे तेलकट पदार्थही तुमचे वजन भरभरुन वाढवू शकतात.

# उन्हाळ्यात शरीर थंड ठेवणार 'हे' घरगुती पदार्थ लाभदायक

**उन्हाळ्यात भयंकर उकाडा वाढतो त्यामुळे सन स्ट्रोकचा सामना करावा लागतो. सध्या वातावरणात होणाऱ्या बदलांमुळे शरीरामध्ये उष्णता वाढत आहे. जरी आपण घराच्या बाहेर पडलो नाही तरी देखील शरीरामध्ये उष्णता वाढत आहे. त्यामुळे शरीर थंड ठेवण्यासाठी घरगुती उपाय काय आहेत ते जाणून घेणार आहोत.**



- **कोथिंबीरचे पाणी** – हिरव्या कोथिंबीरीचे बरेच आरोग्यदायी फायदे असतात. यामध्ये डायट्री फायबर्स, आयर्न, मॅग्नेशिअम मुबलक प्रमाणात असतात. यामुळे व्हिटॅमिन-सी, व्हिटॅमिन-के आणि प्रोटीन वाढण्यास मदत होते. त्यामुळे पाण्यात हिरवी कोथिंबीर भिजत ठेवा आणि त्यानंतर मिक्सरमध्ये वाटून त्यात साखर घालून एकत्र करा. हे पाणी प्यायलाने शरीराला थंडावा मिळण्यास मदत होते.
- **कांद्याचा रस** – कांद्याचा रस हा उत्तम घरगुती उपाय आहे. यामध्ये निसर्गतः थंड गुणधर्म असतात. कांद्याचा रस कानांच्या मागे किंवा गळ्यावर लावल्याने शरीराचे तापमान कमी होते, असे तज्ञांचे मत आहे. शिवाय कांद्यासोबत जीरे आणि मध एकत्र करून सेवन करू शकता. कच्चा कांदा खाल्ल्यानेही शरीर खंड राहते.
- **ताक आणि नारळाचे पाणी** – आपल्या शरीरासाठी आवश्यक व्हिटॅमिन आणि खनिजं प्रदान करण्यासाठी ताक मदत करते. तसेच नारळाचे पाणी तुमच्या शरीरामध्ये नैसर्गिक पद्धतीने इलेक्ट्रोलइट्स संतुलित ठेऊन शरीराला ऊर्जा देण्याचे काम करते. शिवाय शरीरातील पाण्याची कमतरता कमी होत नाही.
- **कैरीचे पन्हे** – उन्हाळ्यात कैरीचे पन्हे पिणे हे शरीराला अत्यंत लाभदायक असते. शरीरातील तापमान नियंत्रण ठेवण्यासाठी कैरीचे पन्हे फायदेशीर असते. शिवाय यामुळे शरीराला आवश्यक इलेक्ट्रोलाइट्स मिळतात. तसेच यामध्ये व्हिटॅमिन, मिनरल्स आणि पोट्रशिअम असते.
- **चिंचेच पाणी** – चिंच गरम पाण्यामध्ये भिजवून त्यामध्ये एक किंवा अर्धा चमचा साखरेसोबत प्या. यामुळे तुमच्या शरीराचे तापमान सामन्य होण्यास मदत होते.

# पाणी पिताना अशी घ्या काळजी…



**दू**षित पाण्यातून पावसाळ्यात आणि एरवीही अनेक आजार पसरतात. विशेषतः पावसाळ्यामध्ये घरात अशुद्ध पाणी येण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे कावीळ, गॅस्ट्रो, कॉलरा, डायरिया असे आजार उद्भवतात. या आजारांपासून लांब राहण्यासाठी पाणी निर्जंतुक व स्वच्छ असणे गरजेचे आहे. ज्याठिकाणी २४ तास पाणी उपलब्ध नसते त्यांच्यासाठी तर हे उपाय जास्तच फायदेशीर ठरतात. तेव्हा घरच्या घरी पाणी स्वच्छ करण्याच्या काही खास पद्धती…

१. **पाणी गाळून घेणे** – वॉटर प्युरीफायरमध्ये पाणी गाळले जाते. त्याचप्रमाणे स्वच्छ कापड किंवा अतिशय बारीक जाळीची गाळणी यांनी पाणी गाळून घेतल्यास ते स्वच्छ होते. त्यामुळे पावसाळ्याच्या दिवसात या पद्धतीचा हमखास वापर करावा. मी चागंल्या सोसायटीमध्ये राहतो त्यामुळे आमच्याकडे चांगले पाणी येते असे वाटत असले तरीही पाणी कायम गाळून मगच प्यावे.

२. **उकळणे** – पाण्याच्या दोन प्रकारच्या दुष्टीपासून आपण आपली काळजी घेतली पाहिजे. भौतिकदृष्टया पाणी दुष्ट होते ते म्हणजे कचरा, माती, गाळ इत्यादी आणि जीव-जंतूंनी पाणी दुष्ट होते. हा अतिशय धोकादायक प्रकार. भौतिक दुष्टी आपण पाणी गाळून, तुरटी फिरवून घालवू शकतो, पण जीव-जंतूंच्या दुष्टीमध्ये पाणी उकळून घेणे जास्त सोयीस्कर आहे. उकळल्यामुळे पाण्यातील जीवजंतू मरुन जातात आणि पाणी शुद्ध होते. लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत कुटुंबातील सर्वांनी उकळलेले पाणी प्यावे. (पाण्याला उकळी फुटल्यानंतर पाणी १०-१५ मिनिटे उकळावे. नंतरच गॅस बंद करावा. पाणी पुरेसे उकळणे गरजेचे आहे.)

३. **तुरटी फिरवणे** – तुरटी फिरवून पाणी शुद्ध करणे ही अतिशय पारंपरिक पद्धत आहे. भरलेल्या पाण्याच्या भांड्यात तुरटी फिरवल्यास पाण्यातील गाळ खाली बसतो आणि पाणी स्वच्छ होते. मात्र तुरटी फिरवली असली तरीही हा पाणी स्वच्छ करण्याचा म्हणावा तितका खात्रीशीर उपाय नसल्याने हे पाणी गाळून आणि उकळूनच प्यावे.

४. **नळाला फडके किंवा फिल्टर बसविणे** – पावसाळ्याच्या दिवसात नळाला काहीसे मातकट आणि अशुद्ध पाणी येते. त्यामुळे हे पाणी भरतानाच काही प्रमाणात स्वच्छ व्हावे यासाठी नळाला कापड बांधावे किंवा गाळणे लावावे. याशिवाय हल्ली बाजारात नळाला लावण्यात येणारी वेगवेगळी फिल्टर्स उपलब्ध असतात. त्यांचा वापरही फायदेशीर ठरु शकतो. यामुळे पाण्यातील सौम्य प्रकारच्या जंतूंचा धोका कमी होण्यास मदत होते.

# काळं सोनं संकटात!

## होर्मुझमुळे इराण पहिल्यांदाच बॅकफूटला, नेमकं काय घडलं?




■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

अमेरिका, इस्रायलनं २८ फेब्रुवारीपासून इराणवर हल्ले सुरु केले. आणि जगाची डोकेदुखी वाढली. या हल्ल्यामध्ये जगाला डोकेदुखी ठरणारा निर्णय इराणने घेतला. तो म्हणजे इराणने थेट होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणारी वाहतूक रोखली. यामुळे जगाला इंधन टंचाई आणि इंधन महागाईचा मोठा फटका बसण्यास सुरुवात झाली. इराणसाठी ट्रम्प कार्ड ठरलेली होर्मुझची सामुद्रधुनी आता त्यांच्याचसाठी अडचणीची ठरु लागली आहे

अमेरिकेनं नौदलाच्या होर्मुझमधील नाकाबंदीचा सर्वाधिक फटका इराणलाच सध्या बसू लागला आहे. युद्ध सुरु झाल्यावर इराणला होर्मुझमुळे फरक पडला नव्हता. कारण इराणची आयात-निर्यात व्यवस्थित सुरु होती. उलट इराणची कमाई वाढली होती. पण आता परिस्थिती बदलली आहे. अमेरिकेच्या नाकाबंदीनं इराणची तेल संपन्नतादेखील धोक्यात आली आहे. अमेरिकेच्या नाकाबंदीनं तेल निर्यात कमी झाली आहे.

आखाती देश मिळून जितकी आयात करतात, त्यातील ५० टक्के धान्य इराणला जातं. ही सगळी आयात होर्मुझमधूनच चालते. अमेरिकेनं नाकाबंदी लावत होर्मझमधून होणारी वाहतूक रोखल्यावर इराणनं बंदर अल खामेनीच्या जागी छाबहार बंदराचा वापर सुरु केला. पण छाबहारची क्षमता केवळ २० टक्के आहे. हीच अवस्था औषधांच्या पुरवठ्याचादेखील आहे.

सध्या इराणकडे तेल साठवायला जागा नसल्यानं इराणला नाईलाजानं तेल उत्पादन बंद करावं लागत आहे. अशाने तेल विहिरी बंद करण्याची नामुष्की इराणवर येईल. तेल विहिरी एकदा बंद केल्यावर त्या लगेच सुरु करता येत नाही. त्यातील दाब बिघडण्याचा धोका असतो. तेल खाली जाऊन पाणी वर येऊ शकतं. त्याला वॉटर कॉनिंग असं म्हणतात.तेलाची विहीर एकदा बंद केल्यावर ती सुरु करण्यासाठी बरीच मेहनत लागते. त्यासाठी मोठा खर्च येतो. विहिरीतून पुन्हा आधी इतकंच उत्पादन काढता येईल याचीही खात्री देता येत नाही. त्यामुळे इराणचं तेल उत्पादन घटण्याचा मोठा धोका आहे.

# भांडुपमध्ये बांधकामस्थळी दुर्घटना

## खड्ड्यात पडून एकाचा मृत्यू, ९ जण जखमी, व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल

■मुंबई। प्रतिनिधी,

भांडुप पश्चिम परिसरात गुरुवारी (दि. २३) उशिरा रात्री बांधकाम सुरू असलेल्या इमारतीच्या जागेवरील खड्ड्यात पडून ९ जण जखमी झाल्याची घटना घडली. मेट्रो मॉलजवळील जनता मार्केट परिसरात ही दुर्घटना घडली असून जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले.



**तातडीने बचावकार्य**

घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल, पोलिस, १०८ रुग्णवाहिका सेवा आणि पालिकेच्या स्थानिक कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमींना बाहेर काढण्यासाठी तातडीने बचावकार्य राबवण्यात आले. या घटनेचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले असून, त्यामध्ये जखमींना खांद्यावर उचलून नेताना आणि अग्निशमन दलाचे कर्मचारी बचावकार्य करताना दिसत आहेत.

**लग्नातील वऱ्हाडी जखमी**

काही माध्यमांच्या वृत्तानुसार, काका पेट्रोल पंपच्या मागे असलेल्या मातेश्वरी हॉलमध्ये लग्नसमारंभ सुरू असताना एका मुलीची छेड काढल्याने वाद निर्माण झाला. छेड काढणाऱ्या अज्ञात तरुणाला पकडण्यासाठी लग्नातील काही तरुण त्याच्या मागे धावले.

पाठलाग करत असताना तो तरुण श्रद्धा कन्स्ट्रक्शनच्या सुरू असलेल्या इमारतीच्या तळमजल्यावर गेला. त्याला शोधण्यासाठी गेलेल्या तरुणांनी तिथे लाकडी फळी आणि पत्र्याने झाकलेली एसटीपी (सांडपाणी प्रक्रिया) टाकी पाहिली. अंधारामुळे अंदाज न आल्याने एक तरुण आधी त्या खोल टाकीत पडला.

**बचाव करताना दुर्घटना वाढली**

त्या तरुणाला बाहेर काढण्यासाठी इतर नातेवाईक आणि तीन मजूर मिळून मदत करण्याचा प्रयत्न करत होते. मात्र, तात्पुरत्या पत्र्याचा आधार तुटल्याने एकामागोमाग एक जण त्या टाकीत कोसळले. या दुर्घटनेत एकूण ९ जण जखमी झाले.

**जखमींची प्रकृती स्थिर**

काही जखमींना क्रिटीकेअर रुग्णालयात दाखल करण्यात आले असून सध्या त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामध्ये अनिकेत कदम (२६), श्रेयस सुर्वे (२५), जयदीप शाह (२१), संकेत जुवाटकर (२५), आदित्य आहेर (२६), अनिकेत महेश पाटील (२०) आणि अंकित कुमार रोहित (१९) यांचा समावेश आहे.

**एकाचा दुर्दैवी मृत्यू**

भालचंद्र फाळे (२५) यांना फोर्टिस रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली.

**सुरक्षा उपायांवर प्रश्नचिन्ह**

प्राथमिक तपासात ही घटना बांधकामस्थळी असलेल्या खड्ड्यामुळे घडल्याचे समोर आले आहे. मात्र, घटनास्थळी आवश्यक सुरक्षा उपाय, बॅरिकेडिंग किंवा इशारा फलक होते का, याबाबत चौकशी केली जाणार आहे.

या घटनेनंतर बांधकामस्थळांवरील सुरक्षेच्या उपाययोजनांबाबत पुन्हा प्रश्न उपस्थित झाले असून प्रशासनाकडून पुढील तपास सुरू करण्यात आला आहे.

# वसई-विरारमध्ये रोटा लसीची कमतरता... लसीकरणासाठी पालकांना करावी लागते प्रतीक्षा

■वसई। प्रतिनिधी,

वसई-विरार महापालिकेच्या दवाखान्यांमध्ये गेल्या काही आठवड्यांपासून रोटा व्हायरस लसीचा तुटवडा निर्माण झाला आहे. त्यामुळे लहान मुलांचे नियमित लसीकरण थांबले असून पालकांना वारंवार दवाखान्याचे फेरे मारावे लागत आहेत. या परिस्थितीमुळे बालआरोग्याबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.

वसई-विरार शहरातील महापालिकेच्या आरोग्य सेवांवर मोठ्या प्रमाणात नागरिक अवलंबून आहेत. शहरात महापालिकेची माताबाल संगोपन केंद्रे, रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्रे, तसेच 'आपला दवाखाना' आणि आरोग्यवर्धिनी केंद्रांमार्फत सेवा दिली जाते. मात्र सध्या या यंत्रणेतच महत्त्वाच्या लसींचा तुटवडा




निर्माण झाल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. गेल्या महिन्याभरापासून पाच वर्षाखालील मुलांसाठी अत्यावश्यक असलेली रोटा व्हायरस उपलब्ध नसल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. लसीकरणासाठी लहान बाळांना घेऊन येणाऱ्या पालकांना लस नसल्याचे सांगितले जात असून त्यांना रिकाम्या हाताने परतावे लागत आहे. त्यामुळे पालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

शहरात दर महिन्याला हजारो मुलांना या लसीची आवश्यकता असते. तरीही पुरवठा खंडित झाल्याने लसीकरणाचा संपूर्ण कार्यक्रम विस्कळीत झाला आहे. विशेष म्हणजे ही लस शासनाच्या राष्ट्रीय लसीकरण कार्यक्रमांतर्गत मोफत देणे बंधनकारक असताना तिचा तुटवडा निर्माण होणे गंभीर बाब मानली जात आहे.

या पार्श्वभूमीवर नगरसेवक महेश सरवणकर यांनी महापालिका प्रशासनाकडे तातडीने लसीचा पुरेसा साठा उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. लहान मुलांचे आरोग्याशी संबंधित विषयात कोणताही हलगर्जीपणा चालणार नाही असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच वेळेत लसीकरण न झाल्यास मुलांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो अशीही भीती व्यक्त केली जात आहे.

**रोटा व्हायरस म्हणजे काय?**

रोटा व्हायरस हा लहान मुलांमध्ये होणाऱ्या गंभीर अतिसाराचा प्रमुख कारणीभूत विषाणू आहे. या संसगार्मुळे उलट्या, जुलाब आणि शरीरातील पाण्याची कमतरता (निर्जलीकरण) होऊ शकते. त्यामुळे लहान मुलांसाठी ही लस अत्यंत महत्त्वाची मानली जाते.

**8 महिन्यांच्या आत लस का आवश्यक?**

रोटा व्हायरस लसीचा पहिला डोस सहा आठवड्यांच्या आत आणि शेवटचा डोस आठ महिन्यांच्या आत देणे आवश्यक असते. ठरलेल्या वेळेत लसीकरण न झाल्यास लसीचा प्रभाव कमी होऊ शकतो आणि मुलांना आजाराचा धोका वाढू शकतो.

"शहरात दर महिन्याला मोठ्या प्रमाणात लस्सींची गरज भासते. सध्या तुटवडा असला तरी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. येत्या काही दिवसात लस्सी उपलब्ध करून देण्यात येतील."

डॉ. भक्ती चौधरी, मुख्य वैद्यकीय अधिकारी

## राज्यातील 30 हजार शिक्षकांच्या नोकरीवर टांगती तलवार

# महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्रात मोठी खळबळ



**शिक्षण विभागाचे पुढील पाऊल?**

शिक्षण विभाग सध्या शाळांमधील संचमान्यता अंतिम करण्याच्या प्रक्रियेत आहे. ३० हजार हा आकडा प्राथमिक अंदाजावर आधारित असून, प्रत्यक्ष पडताळणीनंतर यात बदल होऊ शकतो. मात्र, अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे वेतन रोखले जाणार नाही, असे आश्वासन प्रशासनाकडून दिले जात असले तरी, बदल्यांच्या धास्तीने शिक्षकांमध्ये अस्वस्थता कायम आहे.

■मुंबई। प्रतिनिधी,

महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्रात सध्या चिंतेचे वातावरण पसरले आहे. राज्यातील अनुदानित आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील तब्बल ३० हजार शिक्षकांच्या नोकरीवर टांगती तलवार असल्याचे बोललं जात आहे. अनुदानित आणि जिल्हा परिषद शाळांमधील हे शिक्षक अतिरिक्त ठरण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

कमी होत असलेली पटसंख्या आणि बदलणारे शैक्षणिक नियम यामुळे या शिक्षकांच्या भविष्यावर टांगती तलवार आली असून, शिक्षण वतुर्ळात तीव्र पडसाद उमटत आहेत

**नेमकी परिस्थिती काय?**

राज्यात सध्या १ लाख ८ हजार ३५ शाळा असून, तिथे २ कोटींहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या विद्यार्थ्यांसाठी साधारण ७ लाख ४६ हजार ३७७ शिक्षक कार्यरत आहेत. ही आकडेवारी मोठी वाटत असली, तरी सूक्ष्म स्तरावर चित्र वेगळे आहे. ग्रामीण आणि दुर्गम भागातील अनेक शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या पटसंख्येत झपाट्याने घट होत आहे. काही शाळांमध्ये केवळ १० ते १५ विद्यार्थीच उरले आहेत, तर तिथे शिक्षकांची संख्या मात्र मंजूर पदांनुसार जास्त आहे.

**शासनाचा १५ मार्च २०२४ चा निर्णय**

या पार्श्वभूमीवर शालेय शिक्षण विभागाने १५ मार्च २०२४ रोजी काढलेल्या शासन निर्णयानुसार, ज्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या २० पेक्षा कमी आहे, अशा शाळांमधील शिक्षकांना अतिरिक्त ठरवण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. नियमानुसार विद्यार्थी आणि शिक्षकांचे प्रमाण व्यस्त झाल्याने या शिक्षकांचे समायोजन दुसऱ्या शाळांमध्ये करावे लागणार आहे. या निर्णयामुळे शिक्षकांच्या नोकरीच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांना लांबच्या शाळांमध्ये बदली स्वीकारावी लागेल किंवा त्यांच्या सेवा ज्येष्ठतेवर याचा परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. विशेषतः ग्रामीण भागात काम करणाऱ्या शिक्षकांमध्ये यामुळे मोठी अस्वस्थता आहे.

**शिक्षक संघटनांची भूमिका**

शिक्षक संघटनांनी या धोरणात्मक निर्णयाला कडाडून विरोध केला आहे. त्यांच्या मते, शाळांमधील पटसंख्या कमी होण्यामागे अनेक सामाजिक आणि भौगोलिक कारणे आहेत. केवळ शिक्षकांना अतिरिक्त ठरवून प्रश्न सुटणार नाही, तर सरकारने शाळांची गुणवत्ता वाढवून विद्यार्थ्यांची संख्या वाढवण्यासाठी विशेष मोहीम राबवली पाहिजे, अशी मागणी संघटनांनी केली आहे. आता येत्या शैक्षणिक वर्षात या अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन कसे केले जाते आणि सरकार शिक्षक संघटनांच्या मागणीवर काय तोडगा काढते, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# 7 महाविद्यालयांमधील शिक्षकांना 'यूजीसी'च्या निर्देशानुसार मूळ वेतन... राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय

**मंत्रिमंडळ बैठकीत अन्य महत्त्वाचे निर्णय**

**-अधिमूल्याची पुनर्रचना**

महाराष्ट्र शेतजमीन (ज.धा.क.म.) अधिनियम, १९६१ नुसार वाटप करण्यात आलेल्या जमिनींचे भोगवटादार वर्ग-२ मधून वर्ग-१ मध्ये रुपांतरण करण्यासाठी अधिनियमामध्ये सुधारणा करण्यास तसेच त्यासाठीच्या महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मयार्दा), (भोगवटादार वर्ग-२ चे भोगवटादार वर्ग-१ मध्ये रूपांतरण करणे) नियम, २०२६ ला मान्यता देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या निर्णयामुळे राज्यातील आतापर्यंत वाटप करण्यात आलेल्या १ लाख ७३ हजार ५६०.४ हे. आर जमिनीशी संबंधित १ लाख ९ हजार ८६८ लाभार्थ्यांना यामुळे दिलासा मिळणार आहे.

**-मौजे नागेवाडी येथे आयटी पार्कला जमीन**

सातारा जिल्ह्यातील मौजे नागेवाडी येथे आयटी पार्क उभारण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास ४२.५५ हेक्टर आर. जमीन देण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. ही जमीन एमआयडीसीला शेतजमिनीच्या दराने देण्यात येणार आहे.

■मुंबई। प्रतिनिधी,

राज्यातील सात आदर्श महाविद्यालयातील शिक्षकांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) निदेर्शानुसार मूळ वेतन देण्याचा तसेच या शिक्षकांना उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाच्या पद भरतीमध्ये अतिरिक्त गुण देण्यासह आर्थिक तरतुदींना बुधवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. केंद्र सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाने देशातील ज्या जिल्ह्यांमध्ये राष्ट्रीय नोंदणी दरापेक्षा कमी विद्यार्थी नोंदणी असलेल्या प्रत्येक जिल्ह्यात एक आदर्श महाविद्यालय सुरू करण्याची योजना अकराव्या पंचवार्षिक योजनेत सुरू केली. पहिल्या टप्प्यात



निवडण्यात आलेल्या ९० जिल्ह्यांमध्ये महाराष्ट्रातील सात जिल्ह्यांचा समावेश करून तिथे आदर्श महाविद्यालय स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

**कोणत्या सात आदर्श महाविद्यालयांतील शिक्षकांना मिळणार दिलासा?**

त्यानुसार जालना जिल्ह्यात घनसांवगी (डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्याशी संलग्न), बुलढाणा (संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती), रायगड जिल्ह्यात श्रीवर्धन, हिंगोली, गडचिरोली (गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली), रत्नागिरी जिल्ह्यात आंबवडे आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात तळेरे येथे अशी सात आदर्श महाविद्यालये कार्यरत आहेत. या निर्णयामुळे सात आदर्श महाविद्यालयांतील शिक्षकांना सहायक प्राध्यापक पदावरील युजीसी स्केलनुसार मूळ वेतन, महागाई भत्ता आणि इतर भत्ते मिळतील. तसेच, उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाच्या भविष्यातील पदभरती प्रक्रियेत या शिक्षकांना १० अतिरिक्त गुणही मिळणार आहेत.

## लग्न जुळत नसल्याने तरुणाने पोलीस असल्याचा केला खोटा दावा

# शहरभर अभिनंदनाची बॅनरबाजी... पितळ उघडं पडलं

■अमरावती। प्रतिनिधी,

पुण्यात एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. तरुणाचे लग्न जमत नसल्याने आपण स्वतः एक पोलीस अधिकारी असल्याचे भासवत खोटा दावा केला. या घटनेनं नऱ्हे परिसर हादरून गेला आहे. संबंधित प्रकरणात पोलिसांनी आरोपीवर गुन्हा दाखल केला आहे. आपण पोलीस अधिकारी असल्याचा खोटा बनाव रचणाऱ्या तरुणाचे नाव ऋषिकेश राजू जाधव (वय 26) असे आहे.

ऋषिकेशने आपली पुणे पोलीस शहर विभागात निवड झाल्याचा खोटा बनाव रचला




होता. एवढेच नाहीतर शहरातील विविध ठिकाणी त्याचे फ्लेक्स देखील लावण्यात आले होते. फ्लेक्सवर पोलीस ऋषिकेश राजू जाधव हा पोलीस दलात रुजू झाल्याचे अभिनंदनाची बॅनरबाजी करण्यात आली होती.

मात्र, हा बनावाचे पितळ फार काळ लपून न राहता उघडं पडलं. परिसरातील नागरिकांना संशय आल्यानंतर हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. अशातच अखेर पोलिसांपर्यंत या घटनेची माहिती पोहोचली. तपासादरम्यान, तरुणाने पोलीस ठाण्यात निवड झाल्याची कोणतीही अधिकृत माहिती समोर आली नाही. संबंधित तरुण हा खोटा दावा करत असल्याचे समोर आले.

या प्रकरणाची गंभीर दखल घेत नऱ्हे पोलीस ठाणे येथे तरुणाविरोधात फसवणूक आणि खोटी माहिती दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी नागरिकांना आवाहन करत माहिती दिली की, अशा खोट्या दावांपासून सावध राहावं.

# पालघरमध्ये शेतकऱ्यांच्या युरियाचा काळाबाजार उघड

■पालघर। प्रतिनिधी,

शेतकऱ्यांसाठी असलेल्या युरिया खताचा छुप्या पद्धतीने औद्योगिक वापरासाठी पुरवठा केल्याचा धक्कादायक प्रकार बोईसर परिसरात उघडकीस आला आहे. या प्रकरणी टेम्पो मालक व चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, यामागे मोठे रॅकेट सक्रिय असल्याची शक्यता व्यक्त होत आहे. कृषी विभागाच्या फिर्यादीनंतर बोईसर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. बुधवारी दुपारी पोलिसांनी तारापूर औद्योगिक क्षेत्रात संशयास्पदरीत्या फिरणारा टेम्पो जप्त केला. नाशिक येथून युरिया खताच्या गोण्या घेऊन



आलेला हा टेम्पो २६ मार्च रोजी तारापूर औद्योगिक परिसरातील एका रासायनिक कंपनीजवळ संशयाच्या आधारे अडवण्यात आला होता. तपासादरम्यान गोण्यांवर औद्योगिक वापरासाठी युरिया असा उल्लेख आढळून आला. मात्र, हा युरिया मूळतः शेतीसाठी असलेला असून त्याचा काळाबाजार करून औद्योगिक वापरासाठी वळवण्यात येत असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला.

चालकाकडे युरिया वाहतुकीसंदभार्तील आवश्यक कागदपत्रे नसल्याने संशय अधिकच बळावला. त्यानंतर पोलिसांनी टेम्पो ताब्यात घेत कारवाई केली. पोलिसांच्या उपस्थितीत पंचांसमक्ष पालघर कृषी विभागाच्या निरीक्षकांनी दोन गोण्यांमधून युरियाचे नमुने घेतले. हे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवण्यात आले होते. प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर शुक्रवार, १० एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणात टेम्पो मालक रविंद्र पष्टे आणि चालकाविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. दरम्यान, शेतर्कयांसाठी असलेला युरिया औद्योगिक वापरासाठी वळवणारा एक मोठा माफिया सक्रिय असल्याची शक्यता व्यक्त होत असून, या रॅकेटचा मुख्य सूत्रधार समोर येणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## तरुणीवर मनी लॉन्ड्रिंगसाठी दबाव टाकल्याचा आरोप

# अखेर पीडितेनं संपवलं जीवन



■अंबरनाथ। प्रतिनिधी,

अंबरनाथ येथे सिमरन पाटील नावाच्या एका तरुणीने जीवन संपवलं. तरुण भगवान लोटे हा सिमरनला अवैध कामांमध्ये ढकलण्याचा प्रयत्न करत होता. याच त्रासाला कंटाळून तिने जीवन संपवल्याची माहिती आहे. या प्रकरणी भगवान विरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला, अशी माहिती तपासातून समोर आली.

**बयफ्रेंडने पीडितेला मनी लॉंड्रिंगसाठी आणला दबाव**

सिमरन पाटील ही भगवान लोटे यांच्या कंपनीत अकाउटंट म्हणून कार्यरत होती, त्यांचे एकमेकांशी प्रेमसंबंध झाले होते. लोटेने आपल्या पदाचा फायदा घेत पीडितेशी गैरवर्तन केलं. त्याने तिच्याकडून अनेकदा मनी लॉंड्रिंगची कामे करून घेतली होती. पीडितेला हे काम सोडायचे होते, तिने वारंवार काम सोडण्याबाबत माहिती दिली, मात्र लोटेनं पीडितेवर अनेकदा दबाव आणण्याचा प्रयत्न केला होता, अशी माहिती कुटुंबीयांनी दिली होती.

दरम्यान सध्या आरोपी हा फरार असून त्यांनी आरोपीचा शोध घेण्यास सुरुवात केली आहे. प्राथमिक तपासाच्या माहितीनुसार, भगवान लोटे विरोधात गुन्हा दखल केला आहे.

**पीडितेला फोन कॉल्स, चॅट्सद्वारे अनेकदा मानसिक दबाव आणला**

10 एप्रिल रोजी पीडितेला ए3 पार्क हॉटेलमधील खोली क्रमांक 310 मध्ये बोलावण्यात आले. अनेकदा फोन कॉल्स, चॅटिंगद्वारे तिच्यावर मानसिक दबाव आणण्यात आला होता. संबंधित प्रकरणात आरोपीचा शोध घ्यायचा असून, पोलीस लवकरच त्याला अटक करतील, अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक शब्बीर सय्यद यांनी दिली.

# नालासोपाऱ्यात ऑनलाइन गेमिंगच्या नावाखाली फसवणूक करणाऱ्या 'ॲप क्रिक-कोड' टोळीचा पर्दाफाश

■वसई। प्रतिनिधी,

ऑनलाइन गेमिंगच्या माध्यमातून लोकांना झटपट पैसे कमावण्याचे आमिष दाखवून फसवणूक करणाऱ्या क्रिक-कोड नावाच्या ॲपशी संबंधित टोळीचा नालासोपाऱ्यात पदार्फाश झाला आहे. विरार क्राइम ब्रांचने केलेल्या कारवाईत या प्रकरणातील चार आरोपींना अटक करण्यात आली आहे.

नालासोपाऱ्यात ऑनलाइन फसवणुकीचा मोठा प्रकार उघडकीस आला आहे. विरार क्राइम ब्रांच (युनिट 3) ला मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे म्हाडा कॉलनीतील एका इमारतीवर छापा टाकण्यात आला. येथेच आरोपींनी आपला ह्यकंट्रोल रूमह्ण तयार करून लोकांना फसवण्याचे जाळे उभे केले होते.

ह्लक्रिक-कोडह्व नावाच्या ॲपद्वारे आरोपी लोकांना ऑनलाइन गेमिंगमध्ये गुंतवून मोठा नफा मिळेल असे सांगत




होते. सुरुवातीला थोडा फायदा दाखवून नंतर मोठ्या रकमेची गुंतवणूक करण्यास भाग पाडले जात होते. त्यानंतर मात्र संबंधित व्यक्तीशी संपर्क तोडून त्यांची फसवणूक केली जात होती.

पोलिसांनी केलेल्या कारवाईत आरोपींकडून 10 मोबाईल फोन, 3 लॅपटॉप, 70 ते 80 एटीएम कार्ड, तसेच मोठ्या प्रमाणात चेकबुक आणि बँक पासबुक जप्त करण्यात आले आहेत. याशिवाय क्रिक-कोड ॲपशी संबंधित डिजिटल डेटा देखील पोलिसांच्या हाती लागला आहे.

या प्रकरणात चंदन झा, विकास विश्वकर्मा, यशपाल मिश्रा आणि सचिन रवणे यांना अटक करण्यात आली आहे. हे सर्व आरोपी तांत्रिकदृष्ट्या पारंगत असून त्यांनी आधुनिक पद्धतीने फसवणुकीचे जाळे उभारले होते. पोलीस आता या आरोपींच्या बँक खात्यांची आणि व्यवहारांची सखोल चौकशी करत आहेत. या प्रकरणात आणखी काही लोकांचा सहभाग असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com